## वासाहतिक समाजातील शेतकरी प्रश्न

# प्रकरण दुसरे

## म. जोतीराव फुले व महाराष्ट्रातील शेतीप्रश्न

## प्रकरण दुसरे

## म. जोतीराव फुले व महाराष्ट्रातील शेतीप्रश्न

### १) प्रस्तावना:

महाराष्ट्राच्या शेती प्रश्नावर त्याच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक अंगाने विचार करण्याचा पहिला क्रांतीकारक प्रयत्न म. जोतीराव फुले यांनी केला. शेतीप्रश्नाचे मूळ केवळ आर्थिक नसून शेतक-याच्या शोषणास भारतातील सामाजिक राजकीय व सांस्कृतिक पैलू असल्याचे त्यांनी दाखवून दिले. त्या संदर्भातच त्यांनी वासाहतिक समाजातील सांस्कृतिक क्रांतीचे नेतृत्त्व केले. प्रस्तुत प्रकरणात महाराष्ट्रातील शेतीप्रश्नावर म. जोतीराव फुले यांच्या विचारांचा परामर्श घेण्यात आला आहे.

१९व्या शतकाच्या उत्तरार्धात महाराष्ट्रामध्ये शेतसा-यातील वाढ, धान्याऐवजी पैशामध्ये सारा वसूल करण्याचे सरकारी धोरण आणि त्यातच नोकरशाही राज्यव्यवस्थेतील कडकपणा व सहानुभूतिशून्यता यामुळे शेतक-यांच्या अडचणीत भर पडत गेली. सारा भरण्यासाठी धान्य विकणे जरुर असल्यामुळे शेतक-यांचा बाजारपेठेशी प्रत्यक्ष संबंध येऊ लागला. बाजारपेठेतील भाव स्थानिक पुरवठयाऐवजी जागतिक अन्नधान्य परिस्थितीवर अवलंबून होते त्यामुळे शेतक-यांची अवस्था अतिशय वाईट होती आणि या अस्थिर वातावरणामुळेच त्यांना पैशासाठी सावकारांचे उंबरठे झिजवावे लागत होते. वाढत्या कर्जबाजारीपणामुळे त्यांच्या जमिनी सावकारांच्या ताब्यात जात होत्या. सरकारी कायदेहि शेतक-यांपेक्षा सावकारांना अधिक सोयीस्कर होते. शेतीची अवजारे व बैल कर्जादाखल जप्त करण्यात येऊ नयेत हे कलम १८५९ च्या कायदयात गाळण्यांत आले, मात्र थकबाकी

वसूल करण्यासाठी दावे घालण्याची मुदत १२ वर्षांवरून ३ वर्षांवर आणण्यांत आली. अमेरिकेतील यादवी युध्दांमुळे १८६२ नंतर बाजारात तेजी येत होती, त्यामुळे या कायद्यातील परिणाम तात्काळ दिसून आले नाहीत. भाववाढीचा फायदा घेऊन १८६८ साली सारा वाढविला त्यामुळे भाव गडगडू लागताच शेतकऱ्यांच्यावर प्रचंड प्रमाणात कर्जाचा बोजा पडण्यास सुरवात झाली. याचा परिणाम म्हणून १८७५ साली पुणे, सातारा, सोलापूर व अहमदनगर या जिल्हयांतील शेतकऱ्यांनी दंगे केले व सावकारांची दप्तरे जाळली[१] यातच १८७६-७७ मध्ये महाराष्ट्रात भयंकर दुष्काळ पडला. या सर्वांचा परिणाम म्हणजे शेतकरी अधिकच दरिद्री बनला.

याच दरम्यान म्हणजे साधारणपणे १८५० च्या दरम्यान इंग्रज कारखानदारांच्या आर्थिक धोरणात एक महत्त्वाचा बदल घडून आला तो म्हणजे इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती पूर्ण झाल्यामुळे त्यांना आपले भांडवल गुंतवण्यास नवी बाजारपेठ हवी होती. यासाठी त्यांनी हिंदुस्थानातील पक्का माल युरोपमध्ये खपविण्याऐवजी, इंग्लंडच्या कारखान्यांसाठी हिंदुस्थानात कच्चा माल उत्पादन करण्याचे आणि त्यासाठी रस्ते व लोहमार्ग बांधून आपल्या मालास बाजारपेठा मिळविण्याचे काम ताबडतोब केले. नवीन वाहतुकीच्या साधनामुळे परदेशी मालाचा खप वाढला. त्यामुळे जुन्या उत्पादन साधनांना चिकटून राहिलेले महाराष्ट्रांतील शेकडो कारागीर बेकार झाले. बेकार झालेल्या कामगारांना उपजीविकेसाठी शेतीवर अवलंबून राहावे लागले. याच काळात शिपाईगिरीला वाव नसल्यामुळे हजारों सैनिकांना शेतीखेरीज दुसरा व्यवसाय उरला नाही. या सर्वांचा परिणाम म्हणजे शेतीवरील

लोकसंख्येचा भार मोठया प्रमाणात वाढला.

१८७४ मध्ये इंग्लंडमध्ये टोरी पक्ष अधिकारावर आल्यावर लिटनने १८७८ मध्ये वृत्तपत्र स्वातंत्र्यावर निर्बंध घातले, १८७९ मध्ये आयात मालावरील जकात कर रद्द केली, याचा परिणाम भारतीय व्यवसायावर झाला, अफगाणिस्थानच्या मोहिमेवर लाखो रुपये खर्च झाले होते. ते भरुन काढण्यासाठी नवीन कर बसविण्यात आले. १८७७-७८ मध्ये पडलेल्या दुष्काळामध्ये जवळ जवळ सहा लाख लोक मृत्यूमुखी पडले. या वेळी सरकारने सहानभुतीशून्य धोरण स्वीकारले. सावकारांची कर्जे वाढलीत त्यामुळे त्यांनी भराभर दावे लावण्यास सुरवात केली या सर्वांचा परिणाम म्हणजे १८७३-७४ पासून शेतक-यांनी दंगे सुरु केले. यामध्ये सावकारांच्या जवळची दप्तरे जाळली, कामगारांनी संप केले, ठिकठिकाणी शेतक-यांनी बंडे करण्यास सुरवात केली होती.

महाराष्ट्रामध्ये मुंबई विद्यापीठाची स्थापना १८५७ साली झाल्यानंतर सुशिक्षित मध्यमवर्गाची संख्या वाढली, यामुळे नवीन पांढरपेशा वर्ग निर्माण झाला. शिक्षणामुळे या पांढरपेशा वर्गाच्या आकांक्षा वाढू लागल्या त्याप्रमाणात सरकारी नोकरीचे क्षेत्र स्वतंत्र्य कर्तृत्वास त्यांना अपुरे वाढू लागले. सरकारी नोकरीतील जबाबदारीच्या जागा इंग्लंडमधील वरिष्ठ वर्गासाठी राखून ठेवल्याजात होत्या. औद्योगिक क्षेत्रांतील मोक्याची ठिकाणी फारशी व गुजराती लोकांचे वर्चस्व होते. अशा ही परिस्थितीत काहीनी पैशाच्या लोभाने व्यापार धंद्यात शिरण्याचे धाडस केले. त्यांना १८६५ च्या आर्थिक अरिष्ठांत मोठया प्रमाणात तोटा सहन करावा लागला. अशा प्रकारे महाराष्ट्रातील बुध्दिवान व महत्त्वाकांक्षी तरुणांची सर्वच बाजूंनी कुचंबणा होत होती.

पांढरपेशा तरुण वर्गामध्ये ब्राह्मणवर्गाची जास्त संख्या होती, त्यांनी अशा परिस्थितीतही मिळेल त्या ठिकाणी सरकारी नोकरीत प्रवेश मिळवला. बहुतांशी इंग्रज अधिकारी हे हाताखालच्या नोकरवर्गावरच अवलंबून असल्यामुळे निर्णयासाठी त्यांना त्यांच्यावर अवलंबून रहावे लागत होते. याचा फायदा ब्राह्मण वर्गाने घेतला व प्रशासन व्यवस्थेवर आपली पकड निर्माण केली. सर्वच सरकारी खात्यात ब्राह्मण वर्गाचे प्राबल्य होते, त्यांनी शेतक-यांची मोठया प्रमाणात पिळवणूक केली. त्यामुळे त्या काळात सरकार, ब्राह्मण, नोकरदारवर्ग, बाह्मणभिक्षुक हे शेतक-यां-च्या आर्थिक दैन्यावस्थेला कारणीभूत झाले.

उच्चवर्णीयाकडून होणारी पिळवणूक, इंग्रजाची येथील सत्ता घालवून देणे किंवा त्यांच्याकडून जास्तीत जास्त उच्च नोक-यात संधी मिळणे या उद्देशाने अनेक सामाजिक व राजकीय संघटना निर्माण झाल्या होत्या. यामध्ये आर्यसमाज, ब्राह्मोसमाज, थिऑसफीकल सोसायटी, प्रार्थनासमाज, पुणे सार्वजनिक सभा व १८८५ साली स्थापन झालेल्या राष्ट्रीय काँग्रेसचा समावेश करता येईल. याच दरम्यान बहुजन समाजाची होणारी हाल अपेष्टा व त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी अहोरात्र झटणारा नेता मठमुळेंच्या म्हणाने उदयाला आला, व त्याने आपले जीवीत कार्य ब्राह्मणोत्तरांसाठी खर्च केले. ब्राह्मणात्तेरांना एकत्र आणण्याच्या उद्देशाने त्यांनी २४ सप्टेंबर, १८७३ रोजी "सत्यशोधक समाजाची" स्थापना केली व त्यांनी आपल्या विचाराचा केंद्रबिंदू शूद्र अतिशूद्र शेतकरी वर्ग होता. त्यांचा शेतीव्यवसायाशी प्रत्यक्ष संबंध असल्यामुळे उच्चवर्णीयाकडून होणा-या आर्थिक शोषणाची पूर्ण जाणीव होती. यासाठी त्यांनी इंग्रजांच्या मदतीने त्यांची

होणारी पिळवणूक थांबविण्याचे ठरविले होते. येथे इंग्रज राज्य स्थापन झाल्यावर शेतीविषयक प्रश्नांची चर्चा होऊ लागली. इंग्रजाना जास्तीत जास्त पैसा मिळविण्याच्या दृष्टीकोनातून शेतीव्यवसायामध्ये काही सुधारणा केल्या. त्यामध्ये त्यांनी जमिनीची विभागणी जमीनदारी व रयतवारी या दोन पध्दतीमध्ये करुन महाराष्ट्रात रयतवारी पध्दती सुरु केली.[२]

मात्र महाराष्ट्रातील त्यावेळच्या काही सुधारकांना बंगाल सारखी कायम जमीनदारी पध्दत येथे असावी असे वाटत होते. या मध्ये न्यायमूर्ती रानडे, सार्वजनिक सभा यांचा समावेश होता. त्यांच्यामते येथे जमीनदारी पध्दत लागू केली असती तर त्यातून एतद्देशीय भांडवलदार वर्ग निर्माण झाला असता व शेतीव्यवसायाला संरक्षण मिळाले असते, शेतकरी सुखी बनला असता, पण रयतवारी पध्दतीमुळे शेतकरी अधिकच कर्जबाजारी व दरिद्री बनला, या रयतवारी पध्दतीमुळे शेतक-यांचे अधिक शोषण झाले.[३]

ब्राह्मणोत्तर चळवळीचे नेते म. जोतीराव फुलेंनी मात्र जमीनदारी पध्दतीला विरोध करुन रयतवारी पध्दतीचा पुरस्कार केला. त्यांच्या मते जमीनदार पध्दतीतून विशिष्ट वर्गाची मक्तेदारी कायम राहून ते शूद्र अतिशूद्र शेतक-यांची मोठया प्रमाणात शोषण करतील.यासाठी रयत-वारी पध्दत योग्य आहे असे त्यांचे मत होते, कारण या पध्दतीमुळे जमीन शेतक-याच्या मालकीची झाली, ठराविकच कर भरावा लागे. तिची विक्री-खरेदी करता येत होती. त्यामुळे ही पध्दत सामान्य शेतक-याच्या हिताचीच आहे असे प्रतिपादन फुलेंनी केले होते. रयतवारी पध्दतीमुळे मोठे भांडवलदार तयार होणार नाहीत त्यामुळे त्यांचे आर्थिक शोषण होणार

नाही. या कारणासाठीच त्यांनी जमीनदार पध्दतीला विरोध केला. मात्र रयतवारी पध्दतीमध्ये सुध्दा शेतक-यांच्या अशिक्षितपणा व अज्ञानामुळे त्यांची परिस्थिती बिकट झाली होती व यातून त्यांची सुटका कशी करावी याविषयी म. जोतीराव फुले यांनी त्यांच्या "गुलामगिरी" , "शेतक-याचा आसूड" वगैरे ग्रंथात त्यांचे विचार मांडले.

जोतीराव फुले त्या काळातील सर्वच बाजूने नागवलेल्या बहुजन समाजाचे पुढारी होते. त्यांच्या सत्यशोधक समाजाच्या चळवळीतून महाराष्ट्रातील पहिली कामगार चळवळ व शेतकरी चळवळ उदयास आली.

२) म. जोतीराव फुले यांचे संक्षिप्त चरित्र:

म. जोतीराव फुले यांचे पूर्वज ....पणजोबा हे कटगुणाचे. साताराच्या पूर्वेस पंचवीस मैलावर तेथील वतनदार चौगले हे "गो-हे" होते, हेच जोतीबांचे पणजोबा। जमिनीच्या वादातून यांनी सावकार कुलकर्ण्याचा खून केला आणि कटगुणाचाही रातोरात निरोप घेतला. कटगुण सोडले आणि ते पुणे येथील पुरंदर तालुक्यातील खानवाडीस आले . तिथे जम बसताच ते खानवाडीसच स्थायिक झाले. इथेच त्यांना शेटीबा या पुत्ररत्नाचा लाभ झाला. शेटीबांना फारकाळ पितृछायेत वावरताच आले नाही. वडिलांच्या पश्चात् बसली घडी विस्कटली. देणी तुंबून गावात रहाणे मुश्कील झाले. शेवटी त्यांनी पुण्याची वाट धरली.

पुण्यामध्ये एका मळेवाल्याचा आधार लाभून शेटीबा सुस्थिर झाले. दोनाचे चार हात झाले. कृष्णा, रामू, गोविंदा अशा तीन पत्ररत्नांचाही लाभ झाला. या तीन भावडाना मळेवाल्याने वेण्या, हार, गजरे

करण्याचे काम दिले. या नवीन व्यवसायाबरोबरच त्यांचे मूळ आडनांव "गो-हे" लुप्त होऊन "फुले" हे धंदेवाईक आडनांव रूढ झाले.

गोविंदा-चिमणाबाई या गुणी दांपत्याच्या पोटी जोतींबांचा जन्म इ.स. १८२७ ला झाला. जोतीबा एक वर्षाचे होतात न होतात तोच त्यांचे मातृ छत्र हरपले. जोतीबांना वयाच्या सातव्या वर्षातच शाळेत घातले होते. कनिष्ठ वर्गासाठी उघडलेली ज्ञानाची कवाडे पाहून पोटशूल उठणा-या उच्चवर्णीयांना ती बंद करण्यासाठी जंगजंग पछाडले, परंतु गफार बेगा मुनशी व लेजीट साहेबांनी मध्यस्थी केली अन् बंद पडलेली जोतीबांची शाळा पूर्ववत् सुरु झाली. जोतीबांनी आपल्या "तरूण वयातच समाजामध्ये असणा-या रूढी, परंपरा, जातीयवाद, अंधश्रध्दा यांचे सूक्ष्म अवलोकन केले होते. त्यांनी काही हिंदूच्या धार्मिक स्थळानाही भेटी दिल्या होत्या. उदा. पंढरपूर, नासिक, जेजूरी इत्यादी त्यांना वाचनाचा दांडगा छंद होता. त्यांनी अनेक पुस्तके ग्रंथ वाचले होते यात मार्टीन ल्यूथर, कॉल्व्हिनि, लायोला आणि थॉमसपेन यांच्या ग्रंथांचा समावेश होता."[४]

इ.स. १८४० मध्ये वयाच्या तेराव्या वर्षी कावडी येथील झागडे पाटील यांच्या कन्येशी त्यांचा विवाह झाला. जीवन जगत असताना त्यांना समाजात अनेक चांगले वाईट अनुभव येत होते. तशातच इ.स.१८४८ साली एका उच्चवर्णीय मित्राच्या लग्नात त्यांचा अपमान केला गेला. या गोष्टींचा त्यांच्या मनावर खोलवर परिणाम झाला. त्यांचे मन चेतावून उठले, धर्माच्या नावाखाली चेपला गेलेला समाज, पराकोटीला पोहोचलेला जातीभेद, अज्ञान, दारिद्र्य, अंधश्रध्दा, दुष्ट, रूढींची गुलामगिरी

४१

मोडून काढण्यासाठी, समाज साक्षर करण्यासाठी जोतीबांनी १८४८ मध्ये बुधवार पेठेत चिपळूणाकर वाडयात मुलींच्यासाठी पहिले ज्ञानमंदिर उघडले. हजेरीपटावर मुलींची संख्या वाढू लागली. त्यांनी आपल्या पत्नीला–सावित्रीला–साक्षर केले आणि या आपल्या शिष्येला आपल्याच शाळेत गुरु करुन घेतले. या त्यांच्या शिक्षण कार्यात सनातन्यांनी अडथळे आणण्यास सुरवात केली. जोतीबांच्या वडिलांवर दडपण लाणले त्यामुळे त्यांनी मुलांस व सुनेस घराबाहेर काढले.

१८४९ साली गृहत्याग करताच पोटासाठी जोतीबांनी इमारती, पूल, रस्ते यांचे मक्ते घेण्यास सुरवात केली. समाजाचा युगानुयुगे बधी राहिलेला दुसरा भाग म्हणजे अस्पृश्य वर्ग, या वर्गासाठी इ.स. १८५२ मध्ये नाना पेठेत जोतीबांनी महार, मांग, चांभार, ढेड वगैरे पददलितांसाठी शाळा काढली. अस्पृश्यांसाठी चालविलेली ही भारतातील पहिली शाळा. या त्यांच्या कार्याचा गौरव मुंबईच्या गव्हर्नरकडून पेशव्यांच्या विश्रामबाग वाडयात इ.स. १८५२ मध्ये भव्य सत्कार करण्यात आला.

शिक्षणाचे कार्य मार्गी लागताच त्यांनी सर्व शाळा सरकारच्या ताब्यात दिल्या आणि इतर सामाजिक सुधारणांकडे आपले लक्ष केंद्रित केले. १८६४ रोजी त्यांनी पहिला पुनर्विवाह घडवून आणला. याचवर्षी त्यांनी १८६४ साली स्वत:च्याच वाडयात प्रसूतिगृह व बालहत्या प्रतिबंधक गृहस्थापन केले. त्यासाठी "कोणी विधवेने अज्ञानपणाने वाकडे पाऊल पडून ती गरोदर झाली तर तिने आपल्या (घर नं.३९५) घरात गुप्तपणे बाळंत होऊन जावे" अशा मोठमोठया जाहिराती पुणे शहरात जागोजाग लावल्या. विधवा झालेल्या कोवळया मुलींचे केशवापन करुन त्यांना विद्रूप केले जायचे याविरूद्द सुध्दा त्यांनी प्रयत्न केले व शेवटी याबाबतीत

नाभिकांचा संप घडवून आणला या प्रकारे "न स्त्री स्वातंत्र्यम् अर्हति" या परंपरागत वचनाचे बंधन तोडून स्त्रीजातीला मुक्त केले.

याच वर्षी म्हणजे इ.स.१८६४ रोजी जोतीबा यांचे वडिल गोविंदराव कालावश झाले. सर्वबाबतीत सुधारणाचा ध्यास लागलेल्या जोतीबाने इथे हि एक निराळाच पायंडा पाडला. श्राध्दाला कोणताही धार्मिक विधी न करता आंधळे, पांगळे यांना जेवण दिले. गोरगरीब, हरिजनांच्या मुलांना पाटया, पेन्सिली, पुस्तके वाटली हीच पध्दत दरवर्षी चालू ठेविली.

एका मागून एक सुधारणांचा उरक पाडण्यात जोतीबा गढून गेले होते. स्त्री शिक्षण, स्त्री दास्य, विमोचन, स्त्री स्वातंत्र्याचा प्रश्न मार्गी लागला होता. अज्ञानांधःकारात खितपत पडलेल्या अस्पृश्यांच्या हाती ज्ञानज्योत देऊन रस्ता दाखवणे चाललेच होते. परंतु एवढयानेच भागणार नव्हते. अजून ब-याच गोष्टी घडणे आवश्यक होते. मुख्य अस्पृश्यताच नष्ट करायला पाहिजे म्हणून त्यांनी इ.स. १८६८ ला आपल्या वाडयातील हौद अस्पृश्यासाठी खुला करुन जातीभेदावर पहिला घाव घातला. आपले विचार सर्वत्र दूर पसरविण्यासाठी त्यांनी वाङ्मया-तील प्रकारंणचाही आधार घेतला. १८६९ साली शिवाजीचा पोवाडा रचला. त्याच वर्षी ब्राह्मणांची कसब करणी उजेडात आणण्यासाठी "ब्राह्मणांचे कसब" लिहून प्रसिध्द केले. त्यांनी आपले पुस्तक कुणबी, माळी, महार, मांग इत्यादी महाराष्ट्रीय जनतेला अर्पण केले आहे. १८७३ साली त्यांनी अस्पृश्यता निवारण्यासाठी एक जाहिरनामाच काढला. मात्र तो कोणत्याच वर्तमान पत्राने प्रसिध्द केला नाही. लग्न विधीच्या थातूर मातूर मंत्रासाठी दक्षिणा उपटणा-या ब्राह्मणांची

अडगळ नको म्हणून त्यांनी प्रथम पुरोहितावाचून २५ डिसेंबर, १८७३ला पहिला विवाह सीताराम अल्हाट व राधाबाई निंबणकर या वधूवरांचा घडवून आणला.

हिंदू समाजाच्या अवनतीला कारण असणाऱ्या अवतारवादाचे थोतांड उघडे करण्यासाठी १८७३ साली जोतीबांनी "गुलामगिरी" नावाचा ग्रंथ लिहिला. सर्वांना एकत्रित आणण्यासाठी, सर्वांना जोतीबांनी "सत्यशोधक समाजाची" स्थापना २४ सप्टेंबर , १८७३ रोजी केली. सत्यशोधक समाजाच्या स्थापनेने हिंदू मनावरील धर्माचे दडपण झुगारण्यात आ•

या सार्वजनिक सुधारणा करित असताना फुले मक्ताची कामे घेत त्यावेळी त्यांना वरिष्ठ अधिकारी मजूराचे शोषण करीत आहेत हे दिसून आले. लगेच त्यांनी मजूरांची बाजू घेऊन या प्रवृत्तीवर कडक टीका केली. आपले विचार बहुसंख्य लोकांना पटवून देण्यासाठी त्यांना वृत्तपत्राची गरज वाटू लागली. म्हणून त्यांनी"दीनबंधू" हे साप्ताहिक सर्व आर्थिक अडचणीवर मात करुन १ जानेवारी, १८७७ रोजी त्यचा पहिला अंक काढला. या सुमारास देशात फार मोठा दुष्काळ पडला होता. जोतीबानी "दीनबंधूच्या माध्यमातून सरकारवर कडक कोरडे ओढले. दुष्काळी परिस्थितीचे ह्दयद्रावक व सत्य चित्र निबंधाद्वारे रेखाटून प्रसिध्द केले.

मक्तेदाराप्रमाणेच गिरणीमालक हे सुध्दा मजूरांची पिळवणूक करत होते या विरुध्द त्यांनी आवाज उठविला व त्यांना न्याय मिळवून देण्याच्या इराद्याने १८७९ मध्ये पहिली कामगार सभा बोलविली व यामध्ये पहिली कामगार संघटना स्थापन केली.

इ.स.१८७६ ते १८८२ पर्यंत जोतीबा पुणे, नगरपालिकेचे सभासद

होते. त्यावेळी त्यांनी दारूची दुकाने उघडण्यासाठी नवीन परवाने देऊ नयेत म्हणून करून प्रयत्न केले होते. नगरपालिका मधील वायफळ खर्च थांबवून तो शूद्रातिशूद्राच्यासाठी खर्च करावा यासाठी प्रयत्न केले होते. अस्पृश्य समाजाच्या अडीअडचणी सर्वांना समजाव्यात म्हणून त्यांनी "अस्पृश्यांची कैफियत" हे पुस्तक लिहून काढले. याशिवाय "तृतीय रत्न" नावाचे नाटक लिहून ब्राह्मणांनी पसरविलेल्या अंधश्रध्दा अजेडात आणल्या. "सत्यधर्म बोधक खंड" ही लिहून पूर्ण केले.

इंग्रजी राज्य हिंदूस्थानात स्थापन झाल्यावर त्यांनी १८८२ साली एक प्राथमिक शिक्षणाचा विचार करण्यासाठी कमिशन पाठविले होते. या कमिशनपुढे एकटया जोतीबांनी सरकारचे शिक्षण विषयक धोरण चुकीचे असल्याचे ठणकावून सांगितले. सरकारने बारावर्षाखालील मुला-मुलींना प्रथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करावे असा आग्रह धरला होता.

ब्राह्मणेतरांना संघटीत करून अन्यायाचा प्रतिकार करण्याची जाणीव त्यांच्यात निर्माण करण्याचे कार्य फुलेंचेच होते. "शेतकरी सुखी तर जग सुखी" यावर त्यांचा कटाक्ष होता. त्यांनी इ.स.१८८३ साली लिहिलेला "शेतक-यांचा असूड हा ग्रंथ अनेक दृष्टीने अपूर्व आहे. त्यात शेतक-याच्या अवनत स्थितीचे चित्रण व त्या अवनत स्थितीचा मूळगामी मिमांसा केलेली आहे.

१८८५ साली न्या. रानडयांनी "हिंदू समाजात जरी जातीभेद असला, तरी आपल्या हितास तो बिलकूल आडवा येत नाही" असे एक विधान केले होते. त्याचा समाचार घेण्यासाठी जोतीबांनी "इशारा"

ची निर्मिती केली. इ.स. १८८५ च्या याचवर्षी त्यांनी पंडिता रमाबाई यांनी ख्रिस्ती धर्म स्वीकारून केलेल्या ख्रिस्ती धर्म प्रसाराची प्रशंसा करण्यासाठी "सत्सार"चा अंक सुरु केला. १८८५ साली त्यांनी एक अभिनव झेंडा मिरवणूक काढली होती पाठोपाठ सत्यशोधक समाजाचा वार्षिकोत्सव साजरा करण्याचे ठरले. उत्सव ठाण्यात पार पाडला.

२४ सप्टेंबर, १८८७ रोजी पुण्यात समाजाचा चौदावा वार्षिकोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी सयाजीराव महाराज ही उपस्थित होते. सर्वांच्या विचार विनिमयाने फुले यांची एकसष्ठी मोठया प्रमाणात साजरी करून त्यांना पदवी अर्पण करण्याचे निश्चित केले. ११ मे, १८८८ रोजी मुंबईत हा अनोखा समारंभ पार पडला. बहुजन समाजाच्या उध्दारार्थ झटणाऱ्या या विभूतीस जनता जनार्दनाने "महात्मा" ही पदवी अर्पण केली.

१८८८ च्या सप्टेंबर महिन्यात म. फुले यांना अर्धांगवायूचा झटका आला. उजवे शरीर निकामी झाले. डॉ. विश्राम्जी पोलेंच्या परिश्रमाने ते बरे झाले. तरी उजवे अंग व्याधी जडतीच राहिले. त्यावरही त्यांनी मात केली. त्यांनी डाव्या हाताने लिहिण्याचा सराव केला व "सार्वजनिक सत्यधर्म" लिहून काढला. त्यांचा हा ग्रंथ म्हणजे मानवी स्वातंत्र्याचा जाहिरनामाच आहे. त्यांचा हा ग्रंथ त्यांच्या पश्चात त्यांचे चिरंजीव डॉ. यशवंतराव व त्यांचे शिष्य श्री. भालेकर यांनी प्रसिध्द केला.

१८८९ साली मुंबईस "अखिल भारतीय राष्ट्रीय सभा" भरली असता तिच्या प्रवेशद्वारावर शेतकऱ्याचा पुतळा उभा केला आणि त्यांनी सुनावले

की जोवर यांचा प्रतिनिधी तुमच्यात नाही तोवर पुढारीपण करण्यात तुम्ही अपात्र आहात. वीस कोटी शेतक-यांचा प्रतिनिधी तिच्यावर जोपर्यंत नाही तोपर्यंत तिला राष्ट्रीय सभा म्हणता येणार नाही.

म. फुले व सावित्रीबाई यांना अपत्य नव्हते. सावित्रीबाईसह अनेकांनी सूचना, विनंत्याक करूनही म. फुले यांनी आपल्यासाठी दुस-या लग्नास नकार दिला. त्यांनी आपल्या घरी चालविलेल्या अनाथ बालकाश्रमातील यशवंतास दत्तक घेऊन त्याला डॉक्टर केले. त्याचा विवाह ४ फेब्रुवारी, १८८९ मध्ये ग्यानबा ससाणे यांच्या राधा या मुलीशी समाज पध्दतीने लावला.

वयाची उमेदीची जवळ जवळ पन्नास वर्षे बहुजन हिताय, बहुजन सुखाय झिजले, कष्टलेला हा महात्मा २८ नोव्हेंबर, १८९० रोजी इहलोकीची यात्रा संपवून परलोकी गेला. अज्ञानाची झापडे बांधलेल्या अंधश्रध्देच्या घाण्याला जुंपलेल्या या समाजास विचारी, ज्ञानी, स्वाभिमानी बनविण्यासाठी सर्वस्वाचा होम केला. म. फुले इहलोकी गेले परंतु त्यांचे सत्यशोधकी विचार अजरामर झाले.

सत्यशोधक समाजाने सत्यशोधकीय विचारांच्या चळवळीचे बीजारोपण केले. शेतक-याच्या दैन्याचे सर्वांगीण निदार करण्याचा हा प्रयत्न होता.

३) <u>म. फुले व सत्यशोधकी विचार:</u>

मानव सारिखे निर्मीके निर्मिले ।।
कमी नाही केले । कोणी एक।।

LIBRARY
BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

सर्व माणसे सारखीच आहेत या तत्वावर त्यांचा व सत्यशोधक समाजाचा दृढ विश्वास होता. सत्यशोधक समाजाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे शूद्र, अतिशूद्र यांना ब्राह्मणांच्या सर्वांगिन दास्यातून मुक्त करणे हे होते. सर्व माणसे ही देवाची लेकरे आहेत त्यावर सत्यशोधकी लोकांचा विश्वास होता. देवाची पूजा करण्यासाठी मध्यस्थाची गरज नाही असे त्यांचे तत्त्व होते. या सत्यशोधकी समाजाचे सदस्य मुक्त होते. शूद्र अतिशूद्र यांना त्यांच्या हक्काची जाणीव करुन देऊन, त्यांचे शोषण कोणामार्फत, कोणत्या मार्गाने केले जाते या विषयी जागृती करणे हे या समाजाचे महत्त्वाचे काम होते.

म. जोतीराव फुले यांच्या विचारांचे वर्गीकरण पुढील प्रमाणे करता येईल. (१) सांस्कृतीक, (२) सामाजिक, (३) आर्थिक, (४) राजकीय.

(१) सांस्कृतीक विचार:

महात्मा जोतीराव फुल्यानी हिंदू समाज व त्यांच्या संस्कृतीवर जोरदार हल्ला चढवून आपल्या चळवळीस सुरुवात केली. त्यांनी हिंदूच्या केवळ सामाजिक मूल्यावरच हल्ला चढविला नाही तर सांस्कृतिक मूल्यावर ही हल्ला चढविला. ते म्हणतात की ब्राह्मणांनी वर्ण-जातीभेदांची ही रचना टिकविण्यासाठी पाप-पुण्य, नीती-अनीती, पूजा-अर्चा, यम-नियम, देव-दानव, ज्ञा-जाण्य इत्यादी कल्पनांचे थोतांड रचून अहं-न्यून गंडाचे व धर्म भोळेपणाचे कायमचे कुसंस्कार घडविणारी पाखंडा संस्कृती उभारली. याचे त्यांनी एका पद्यरचनेत केलेले वर्णन फारच मार्मिक आहे. ते लिहितात-

"कल्पनेचे देव कोरिले उदंड रचिले पाखंड । हितासाठी ।
किन्नर गंधर्व ग्रंथी नाचविणे । यज्ञ फसविले । कृत्रिमाने ।
निर्लज्ज सोवळे त्याचे अधिष्ठान । भोंदिती निदान । शूद्रादिली ।[५]

ब्राह्मणांचे या मिथ्या विचाराच्या सर्व अंगांचा ते बहुरूपी ठकाचे, लुटून खाण्याचे कृत्रिम सोंग म्हणतात. "स्कार्ला" ते बागलबुवा किंवा "बुजगावणे" म्हणतात.[६] मूर्ती पूजेविषयी ते म्हणतात, "शूद्रादि अतिशूद्रास दास केल्या विषयाचे पेच पाच मुददाम उघडकीस न आणिता त्यास नाना प्रकारच्या धातू दगडाच्या मूर्तीवर भाव ठेवावयास शिकवून त्यास कलिपत ब्राह्मधोळात ढकलून दिले.[७]

२) सामाजिक अंग:

प्राचीन काळापासून ब्राह्मण अस्पृश्यांचा निर्दयपणे छळ करीत होते. त्यांना इमारतीच्या पायासाठी बळी देऊन दडपून मारीत असत. नदी स्नानाच्या ठिकाणी अस्पृश्यांच्या हातून पाण्याचा शितोंडा उडून ब्राह्मणाच्या अंगावर पडल्याचा भास जरी झाला तरी त्यांना मारहाण करीत. प्रात:काळी चुकून भटाच्या अंगावर त्यांची छाया जरी पडली तरी त्यांना मारपीट होई.[८] या निर्दय छळाने किती अमानुष स्वरूप धारण केले होते हे सांगताना ते लिहितात.

(१) "तान्हेने व्याकुळ जरी मांग मेला ।
दया ब्राह्मणा येत नाही ।।[९]

(२) ब्राह्मणांचे आप्त अत्यंत भावंडा ।
छळिते उदंड । बळी देता ।।

मांगचा विलाप भटावाटे गोड
खरे धर्मलंड । जोती म्हणे ।। [१०]

वरील प्रमाणे अस्पृश्य जातीशी ते ज्याप्रमाणे छळ करितात याचा अर्थ इतर जातीशी त्यांचे सख्य नव्हते. त्यांचा सुध्दा याचप्रकारे कमीजास्त प्रमाणात छळ करतात. शूद्र अतिशूद्र बारा बलुतेदार यांच्या मध्ये सुध्दा म्हणजे ब्राह्मण सोडून इतर जातीमध्ये सुध्दा एकवाक्यता नव्हतीच असे जोतीरावांचे मत होते आणि यामुळेच ब्राह्मणांचे वर्चस्व समाजावर प्रस्थापित झाले होते, त्यांच्या भिक्षुक शाहीरला सर्वच समाज शरण जात होता.

(३) आर्थिक अंग:

ऐतखाऊ व कष्टकरी अशा श्रमविभागणीला कायमचे स्वरुप प्राप्त व्हावे म्हणून वर्ण-जाती भेदाच्या पायावर व्यवसायांची रचना केली आहे. शूद्र, अतिशूद्र, कष्टकरी यांची एका विशिष्ट पध्दतीने उच्चवर्णीय ब्राह्मणांच्याकडून आर्थिक शोषण होते. यामध्ये त्यांचे हित अहित यांचा विचार न करता मिळेल त्या मार्गाने त्याचे आर्थिक शोषण केले जाते. असे म. फुलेंचे मत होते.

(४) राजकीय अंग:

फुल्यांच्या मते बळीस्थानाची जिंकलेली सत्ता आपल्या हातात कायम ठेवण्यासाठी कायद्यांची व न्यायाची एकमतलबी अशी चौकट आर्यांनी बनविली.[११] आणि शूद्र, अतिशूद्र व स्त्रिया यांना निर्मिकाने बहाल केलेले सर्व हक्क व सर्व स्वातंत्र्ये नाकारणारे कायदे केले.[१२] शूद्रातिशूद्रांना मानवतेचे सर्व मान्य असे अधिकार नाकारुन ब्राह्मणांनी स्वत:साठी विशेष सवलती व देणग्यांचे कुरण मुक्त ठेवणारे विशेष हक्क राखून ठेविले.[१३]

थोडक्यात ब्राह्मणांचे शूद्रांना फसवून व लुटून खाण्याचे, धर्मातून राजकारण करण्याचे कपट यशस्वी झाले आणि त्यांनी शूद्रावर अतिशय अन्यायकारक अशी गुलामगिरी लादली असे फुलेयांचे मत होते.

सर्वांना सारखच हक्क, सारखेच अधिकार प्राप्त होण्यासाठी त्यांच्या त्यांच्या मनातून अधिकाराची जाणीव निर्माण केली पाहिजे व ही जाणीव त्यांचे अज्ञान घालविल्याशिवाय निर्माण होणे शक्य नाही हे फुल्यांनी पुरेपूर ओळखले होते आणि म्हणूनच महाराष्ट्राच्या कानाकोप-यात घुमणारी सत्यधर्माची तुतारी त्यांना फुंकली. २४ सप्टेंबर, १८७३ साली त्यांनी सत्यशोधक समाज स्थापन केला. त्यासाठी काही धोरण ठरविले. ते पुढील प्रमाणे; ब्राह्मण, भट, जोशी, उपाध्ये इत्यादीक लोकांच्या दास्यत्वापासून शूद्र लोकांना मुक्त करण्याकरता व हजारो वर्षांचे त्यांचे अज्ञान दूर करुन त्यांना त्यांचे वास्तविक अधिकार समजावून देण्याकरिता काही सूज्ञ, शूद्र मंडळीनी हा समाज स्थान केला. या समाजात राजकीय विषयावर बोलणी अजिबात वर्ज्य आहे.[१४]

मानवतेची बूज राखण्यासाठी उपक्रमांचा त्रिशूळ सत्यशोधक समाजाने स्वीकारला.

१) देव व भक्त यामध्ये मध्यस्थाची गरज नाही, अंधश्रध्दा, धार्मिक गुलामगिरीतून लोकांची मुक्तता करणे. भटभिक्षुकि धर्माचा धाक घालून अडाणी जनतेची जी अर्धमाने पिळवणूक करतात त्या अन्यायापासून त्यांची सुटका करणे.

२) जमीनदान व सावकार यांच्या मगरमिठीतून शेतक-यांची सुटका करणे.

३) शिक्षण सर्वांना सहज उपलब्ध व्हावे व सर्वांनी शिक्षण घ्यावे म्हणून प्रयत्न करणे.

"शिक्षणाशिवाय ज्ञान नाही, ज्ञानाशिवाय मती नाही, मतिशिवाय गती नाही, गतीशिवाय प्रगती नाही" ही जोतीरावांच्या विचारांची पक्की बैठक होती. "महारांच गाणं, कुणब्यांचे दाण आणि बामनाचं शिक्षण" ही अंतरी दृढमूळे झालेली लोकांची भावना त्यात ब्राह्मणांनी युक्तीने आपल्या स्वाधीन विद्या ठेवलेली, इतरास शिकवू नये असा धर्म लावून दिलेला.[१५] अशा रितीने आजपर्यंत बहुजन समाजास अज्ञानावस्थेत ठेवण्याची खबरदारी घेतली गेली असल्यामुळे त्यास आपल्या अवनतीचे मुळीच ज्ञान झाले नव्हते.[१६] ही चमत्कारिक कोंडी फोडण्यासाठी सत्यशोधक समाजासाठी मिशन-यांची साथ घेतली आणि इंग्रज सरकारला मदतीची साद घातली.

ग्रंथ प्रामाण्यांच्या डिंढोरा (दिंढोरा) पिटणा-या, धर्म प्रामाण्याचे स्तोम माजविणा-या समाजाला विचार प्रामाण्य म्हणजे काय हे फुले यांनी दाखवून दिले. जन्मत:च परमेश्वराने सर्व मनवास सारखे अधिकार दिले असताना धार्मिक, राजकीय हक्कात सर्वांना सारखेच भागिदार केले असताना एकाने दुस-यावर हुकमत गाजवणे अन्याय्य आहे अशी त्यांची विचारसरणी होती.

शेतक-यांच्या व कामगार वर्गाच्या शोषणाचा प्रतिकार बहुजन समाजाचे तसेच स्त्रियांचे शिक्षण, जातिभेदाचे उच्चाटन देव आणि भक्तातील पुरोहिताची दलाली नाहीशी करणे हे सत्यशोधक समाजापुढचे महत्त्वाचे काम होते. ब्राह्मणेत्तर बहुजन समाजाचे ज्ञानार्जनाच्या ध्यास घ्यावा, पिढयान पिढया स्वीकारलेल्या ब्राह्मणांच्या दास्यत्वाचा पट्टा झुगारून द्यावा, स्वत:ची सुधारणा करण्यासाठी व्यसनमुक्त व्हावे हा त्यांच्या विचाराचा मुख्य गाभा होता. म्हणून ते म्हणतात की, जर

एखाद्या चांभाराच्या मुलाला योग्य शिक्षण मिळाले तर तो सुध्दा शंकराचार्यांच्या तोडीचा विद्वान होऊ शकेल. विद्वत्ताही दैवी देणगी आहे. ती जन्मावर वा जातीवर अवलंबून नाही. म्हणूनच सतत त्यांनी बहुजन समाजाच्या शिक्षणाचा पाठपुरावा केला. शिक्षणाने ज्ञानचक्षु उघडलेल्या नव्या पिढीला भटांच्या भोंदूगिरीचा उमज पडेल. अन् ती आपोआपच त्यांची गुलामगिरी फेकून देईल. मात्र त्यासाठी त्यांनी डोळे उघडे ठेवून अवती भवतीच्या विश्वासत प्रत्यही घडत जाणाऱ्या सुधारणीचा कानोसा घेतला पाहिजे. दारु, गांजा, अफू, इत्यादी व्यसनापायी होणारी आर्थिक आणि शारिरीक, सामाजिक दुर्दशा त्यांना कळून आली पाहिजे.

म. फुले यांनी सत्यशोधक समाजाच्या तत्त्वज्ञानाचा व विचार-सरणीचा प्रसार करण्यासाठी लिहिलेल्या पोवाडयातूनही त्यांनी मानवी ऐक्य, जातीभेदाचा तिरस्कार, व्यक्तीस्वातंत्र्य वगैरे विचारच सांगितले आहेत. "ब्राह्मणाचे कसब" हे पोवाडा ब्राह्मणांच्या दास्यत्वातून शूद्रांच्या मुक्ततेसाठीच लिहीला आहे. ब्राह्मणांची ठकबाजी उघड करताना ते शूद्रांच्या भोळेपणावरही आघात करतात. त्यांच्या त्याच सत्यशोधकी विचाराचा धागा "शेतकऱ्यांचा आसूड" या शेतकऱ्यांच्या कैफतीमधील पुस्तकात दिसून येते.

सत्यशोधक चळवळीने शेतकऱ्यांच्या समस्यांचा ऊहापोह केला.

(४) शेतकऱ्यांचा आसूड एक परिचय:

शूद्र, अतिशूद्र आणि स्त्री हे मा फुले यांच्या चिंतन लेखनाचा आणि कार्याचा केंद्रबिंदू होता. म. फुलांनी या वर्गाचा

विचार करताना केवळ आर्थिक अन्यायाचा विचार केला नाही. तर जातीच्या रचनेमुळे त्यांची आर्थिक दुर्दशा कशी झाली याचा ही म. फुलेनी सविस्तरपणे केला आहे.

"शेतक-यांचा आसूड" हा महात्मा फुले यांचा शेतक-यांच्या प्रश्नावरील अतिशय महत्त्वाचा ग्रंथ होय. हा ग्रंथ लिहिण्यास तात्कालीन परिस्थिती कारणीभूत झाली होती. म. फुलेच्या पूर्वी काही जणांनी शेतीविषयक प्रश्नांची मीमांसा करण्याचा प्रयत्न केला होता परंतु म. फुलेनी एकूण सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक व आर्थिक बाजूचा विचार करून शेतकरी व शेतीविषयक प्रश्नांचा सखोल विवेचन या ग्रंथात केले आहे. "शेतक-याचा आसूड" हा ग्रंथ लिहीण्यापूर्वी त्यांनी तत्कालीन परिस्थिती व पूर्वीची शेतक-याची परिस्थिती यांचा अत्यंत बारकाईने अभ्यास करून आपली मते स्पष्ट मांडली आहेत.

इंग्रजी राजवटीमुळे शेती व्यवसायापासून ते न्यायव्यवस्थेपर्यंत संपूर्ण नवीरचना व नवीन प्रशासन निर्माण झाले. "इंग्रजांनी प्रथमत:च येथील जमिनीच्या आणि शेतक-याच्या संदर्भात रयतवारी पध्दती सुरु केली.[१७] यामुळे शेतसा-याची जबाबदारी शेतक-यावर पडली. हा शेतसारा उत्पन्नाच्या मानाने जास्तच होता. इंग्रजांचे राज्य येण्यापूर्वी शेतकरी कुटूंबातील अनेकजण संस्थानिकाकडे सैन्यात होते, इंग्रजी राजवटी नंतर हे सैन्य कमी झाले त्यामुळे सहाजिकच त्यांचा ही भार शेतीवर पडला. वारंवार पडणारा दुष्काळ, अपुरी शेती, जमिनीची नापीकता इत्यादी कारणामुळे शेतक-यांची एकूण स्थिती बिकट झाली. याचा फायदा सावकार-मारवाडी व त्यांना सामील असणा-या ब्राह्मणांनी

घेतला. अज्ञानी व गरजू शेतक-यांना भरमसाठ व्याजाने कर्ज देऊन त्यांची ते लुबाडणूक करु लागले. भरमसाट व्याजामुळे जमिनी सावकारीच्या ताब्यात जात होत्या. याचबरोबर सुलभ दळणवळणाची साधने, जागतिक मंदी, इंग्रजांच्या मालावरील जकात काढून टाकून येथील मालावर लादणे इत्यादी कारणामुळे शेतकरी अडचणीत आला. त्याच-प्रमाणे येथील कारागीरही अडचणीत आला. या दोन्ही वर्गाच्या पिळवणूकीस सुरुवात झाली होती. अशा प्रकारे शेतक-याची पिळवणूक इंग्रजी राजवटीमध्ये होत होती याचा अर्थ त्यांच्या पूर्वी म्हणजे पेशवे काळात ती होत नव्हती असा नाही. फुलेनी त्याही काळाचा विचार केलाच आहे. फुले म्हणतात, "इतिहासावरुन पाहिले असता असे समजते की, कित्येकांनी एखाद्या मिथ्या व क्षुल्लक कारणाकरिता प्रजेपैकी शेकडो मनुष्यांस मदत करुन शेवटी त्यास मोठे दुष्ट रीतीने मारावे, लहान-सहान अपराधांकरिता मनुष्याचे हालहाल करुन त्यास देहांत शिक्षा द्यावी. यावेळेस मनुष्यास शिक्षा देण्याचा मार्गही मोठा विलक्षण व भयंकर होता..... थोडकेच दिवसामागे म्हणजे आर्य पेशवे यांचे शेवटी कुलदीपक पुरुष रावबाजीचे कारकिर्दीचा अस्त होईतोपर्यंत शेतकरी लोक शेतसारा देण्यास थोडेसे चुकले तर त्यास उन्हामध्ये अणावे करुन पाठीवर एक मोठा दगड द्यावा अथवा त्या शेतक-याच्या बायकोस त्याच्या पाठीवर बसवावे आणि खालून त्यास धूर द्यावा."[१८]

थोडक्यात शतकांनुशतकांपासून शेतक-यांचे हाल चालू होते. ते नवीन राजवटीमुळे आणखीनच वाढले. या संपूर्ण पार्श्वभूमीवर म. फुलेनी शेतकरी, शेतमजूर आणि कष्टकरी यांची दु:खे आपल्या लेखणीतून "शेतक-यांचा असूड"मध्ये प्रकट केली आहेत. यामध्ये शेतक-यांची

पूर्वस्थिती, त्यांची सद्य:स्थिती, त्यांचे होणारे शोषण, त्यांचे अज्ञान त्यांच्या हालअपेष्टा व त्यांवरील उपाय इत्यादी अनेकविध बाबींचा परामर्ष म. फुलेनी आपले अनुभव, विचार व चिंतन यांच्या साह्याने "शेतक-यांचा असूड" या ग्रंथामध्ये एकत्रित केले आहेत. यामध्ये प्रामुख्याने त्यांनी मध्यम व कनिष्ठ प्रतीच्या शेतक-यांची हालाखी व दु:खे प्रकट केली आहेत. या ग्रंथाचे लेखन चालू असताना "पुणे, मुंबई, ठाणे, जुन्नर, ओतूर इत्यादी वेगवेगळ्या ठिकाणी राहणा-या आपल्या माहितगार शूद्र मित्रांना त्यातील मजकूर वेळोवेळी वाचून दाखवून त्याच्या खरेपणाची जोतीरावांनी खात्री करुन घेतली होती."[१९] हा ग्रंथ अलीकडेच इ.स. १९६७ मध्ये मुंबई मराठी ग्रंथसंग्रहाच्या मराठी संशोधन मंडळाने प्रथम प्रकाशित केला.

म. फुले यांचा शेतक-यांचा आसूड एकूण पाच प्रकरणात विभागला आहे. ह्या ग्रंथाच्या उपोद्घाताच्या प्रारंभी तर त्यांनी

"विद्येविना मती गेली। मतीविना नीती गेली ।।
नीतीविना गती गेली। गतीविना वित्त गेले ।।
वित्तविना शूद्र खचले। इतके अनर्थ एका अविद्येने केले ।। [२०]

असे म्हटले आहे. सामाजिक जीवनाच्या वेगवेगळया क्षेत्रांमध्ये त्यांच्या अज्ञान व अशिक्षितपणामुळे होणा-या आर्थिक शोषणाकडे या ग्रंथाच्या द्वारे जोतीरावांनी सर्वांचे लक्ष वेधले आहे.

"शेतक-यांच्या आसूडच्या" पहिल्या प्रकरणात शेतक-यांचा "धर्ममिषाने" घडणा-या शोषणाचे विवेचन केले आहे. शेतक-यांच्या

~~"धर्मनिष्ठाने" घडणा-या शोषणाचे विवेचन केले आहे. शेतक-यांच्या~~ जन्माच्या आधीपासून ते मृत्यूनंतरही ग्रामव्यवस्थेतील उच्चवर्णीय ब्राह्मण आपल्या उच्चवर्णीयास्त्वाचा फायदा घेऊन आर्थिक शोषण कसे करतात याचे सविस्तर विवेचन केले आहे. मुलांच्या लग्नाच्या वेळी, लग्न समारंभात, घर बांधताना आणि मृत्यूच्या वेळीही, तसेच चैत्रातील वर्षप्रतिदा, रामनवमी, हनुमान जयंती, नागपंचमी, श्रावणी, पौर्णिमा, श्रावणातले सगळे सोमवार, हरितालिका गणेश चतुर्थी, ऋषिपंचमी, अनंत चतुर्दशी, किजयादशामी, अमावस्येची लक्ष्मीपूजा, बलिप्रतिदा, तुळशीचे लग्न, मकर संक्रांत, महाशिवरात्री, होळी इत्यादी अनेकविध सण, याशिवाय तीर्थयात्रा, जत्राखेत्रा, चंद्रग्रहण, सूर्यग्रहण अशा अनेक प्रकारे ब्राहमणभिक्षूक शेतक-यांचे आर्थिक शोषण मोठया प्रमाणात करित होते.

(2) दुस-या प्रकरणात सरकारी नोकरांच्या शोषणा विषयी लिहितात. इंग्रजी राजवटीमध्ये अनेक नवीन खाती निर्माण झाली यामध्ये महसूल खाते, जंगल खाते, न्याय खाते, शिक्षण खाते, पोलीस खाते इत्यादी एकमेकांशी संबंधित असणारी खाती निर्माण झालीत या सर्व खात्यामध्ये ब्राहमण कामगारच प्रामुख्याने शिरले होते. भट कामगा-रांच्या लाचखाऊपणाचे आणि छळाचे सविस्तर चित्रण फुलेनी या प्रकरणात केले आहे. शेतक-यांच्याकडून पैसे उकळणे, आपल्याला फायदेशीर अशा नोंदी करणे, साक्षीदारामध्ये फूट पाडणे, वरच्या अधिका-यांना चुकीची माहिती देणे, न्याय कोणात्या का बाजूने लागेना स्वत:चा भरपूर पैसा मिळविणे इत्यादी मार्गाने शेतक-यांचे आर्थिक शोषण करणे, शेतक-यांना अपमानास्पद वागणूक देतात. शेतक-यांचे आर्थिक शोषण करून मिळविलेला पैसा ब्राहमण कामगार कसे बेफिकीरपणे व स्वत:च्या चैनीसाठी खर्च करतात

हे ही सांगताना ते म्हणतात, "काडी महालात जाऊन वेसवारांडीच्या मुखास चुंबन तुंबडया लावून त्यांच्या मुखरसाचे घुटके" घेत बसतात. इंग्रज अधिकारी या भट-ब्राह्मणांच्या नोकरशाहीवर विसंबून असलेले आधीच उच्चवर्णीय त्यात नोकरशाही, अप्रत्यक्षपणे इंग्रजीचे संरक्षण यामुळे ते कसे बेजबाबदारपणे वागतात याचेही चित्राण फुलेंनी केले आहे. म्हणूनच ते म्हणतात, दुष्काळापासून किंवा टोळयांच्या तडाक्यापासून होणारे नुकसान केंव्हातरी भरून येईल पण ऐषआरामात असणा-या युरोपियन कामगार व त्यामुळे ब्राह्मणांचे प्रशासन व्यवस्थेमधील वर्चस्व यामुळे अक्षरशून्य शेतक-यांचे होणारे नुकसान कधीही भरून येणार नाही.[२१]

(३) या ग्रंथाच्या तिस-या प्रकरणात नवीनच निर्माण झालेल्या मारवाडी-सावकार यांच्याकडून होणा-या आर्थिक शोषणाचा परामर्ष घेतला आहे. शेतकरी वर्ग शेतसारा, दुष्काळ, ब्राह्मणवर्ग, कामगार सरकारची धोरणे जमिनीवरील अतिरिक्त भार इत्यादी कारणामुळे कर्जबाजारी झाला होता. यासाठी त्याला सावकारांकडे जाणे भागच होते. सावकार भरमसाठ व्याजाने कर्ज देत होता. सावकारांच्या कर्जाची परतफेड न झाल्यामुळे शेतक-यांच्या जमिनीचे हस्तांतरण सावकाराकडे होऊ लागले. भटीभक्षूक ब्राह्मण कामगार अनेक प्रकारे भूलथापा देऊन, शेतक-याला व त्याच्या कुटूंबाला उपाशी ठेऊन त्याला कर्जबाजारी कसे बनवतात याचे सविस्तर विवेचन या प्रकरणात केले आहे. या प्रकरणाच्या शेवटी फुले म्हणतात, "गो-या व काळया कामगारांना जे भरपूर पगार आहेत ते कमि करून शेतक-यांच्यावर जे डोईजड कर लादले आहेत ते सरकारने कमी करावेत."

या ग्रंथाच्या चौथ्या प्रकरणात शेतक-यांच्या दुर्दशेचे व दयनीय अवस्थेचे, कर्जबाजारीपणाचे आणि या सर्वांचा परिणाम म्हणून झालेल्या त्यांच्या भ्रमिष्ट अवस्थेचे, उध्वस्ततेचे मोठे परिणाम-कारक चित्र रेखाटले आहे. त्याचबरोबर शेतकरी स्वत:च्या अज्ञानामुळे ही नागवला जात आहे हे ही फुल्यांनी येथे नमूद केले आहे. त्याचबरोबर शेतक-याच्या शेतीचे ही चित्रण याच प्रकरणात केले आहे. यामध्ये शेतीला आवश्यक असणारी साधनसामुग्रीच्या अभावी शेतीची मशागत होईना त्यामुळे पिके येईनात. भाऊहिस्से वाढल्यामुळे पडीक जमिन उरली नाही. त्यामुळे पिके बेताचीच येत होती. मात्र शेतसारा कमी झाला नाही. तो दर तीस वर्षांनी वाढतच होता. यातच दुय्यम धंदे बंद झाले इत्यादीचे वर्णन या प्रकरणात केले आहे.

या ग्रंथाच्या शेवटच्या प्रकरणात शेतकरी व त्याची शेतीसुधारणा यासाठी सरकारने कोणते उपाय योजावेत यासंबंधीचे विवेचन केले आहे. यामध्ये निरनिराळया प्रकारे शोषल्याजाणा-या अज्ञानी, दरिद्र शेतक--याला सुधारण्यासाठी त्याला शिक्षणाची आवश्यकता सांगितली आहे. शेतक-यांच्या मुलांना शिक्षण देऊन त्या सरकारी नोकरीत जागा याव्यात, ब्राह्मणांना जास्त जागा देऊ नयेत, लग्नविधीसाठी सक्ती करु नयेत इ. उपाय शेतक-यांना सुधारण्यासाठी सांगतात तर शेती सुधारण्यासाठी काही उपाय सुचवितात यामध्ये फुल्यांनी शेतक-यांना आधुनिक शेतकी ज्ञानाची माहिती द्यावी, त्यांना चांगला बैलांचा पुरवठा करावा. बि-बीयाणांची पैदास करावी. शेतीला पाणी पुरवठा करण्यासाठी धरणे बांधावीत. जंगल खाते नष्ट करावे, इत्यादी उपाय योजना या ग्रंथाच्या शेवटी केल्या आहेत.

थोडक्यात "शेतक-यांचा असूड" मध्ये म. फुले यांनी शेतक-यांच्या दैन्यावस्थेची अत्यंत सूक्ष्म परिक्षण करुन, त्यांच्या शोषणाला जबाबदार असलेल्या घटकांना अगदी रोखठोक दोष दिला आहे. या ग्रंथातील आणखीन एक गोष्ट नमूद करावीशी वाटते ती म्हणजे धर्माभिमानी ब्राह्मण, नोकरशाहीतील पुरोहितवर्ग व सावकार मारवाडयांचा वर्ग या तिन्ही वर्गांची शेतक-याच्या शोषणाच्या मुद्यावर हातमिळवणी झाली होती. शोषकांचा हा वर्ग अतिशय बलिष्ठ होता. त्यामुळेच शेतक-याला सरकारकडे न्याय मागणे अवघड झाले होते. याविषयी फुले आसूडमध्ये लिहितात. ज्या सावकाराच्या आईचा भाऊ रेव्हेन्यू साहेबांचा दप्तरदार, चुलता क्लेक्टर साहेबांचा चिटणीस, थोरल्या बहिणीचा नवरा मुनसफ आणि बायकोचा बाप हा तालुक्याचा फौजदार, याशिवाय एकंदर सर्व सरकारी कचे-यात त्यांचे जातवाले ब्राह्मण कामगार..... माझा सर्व उन्हाळा केला असता.[२२]

त्याचबरोबर शेतक-यांनीही अज्ञान, आळस, सुखासीनता, धर्म-भोळेपणा, व्यसनासक्ती, गतानुगीतकता इत्यादी आपले दोष काढून टाकले पाहिजेत, आणि डोळे उघडे ठेवून आपल्या हितसंबंधांची जपणूक केली पाहिजे, याचीही जोतीरावांनी त्यांना जाणीव करुन दिली आहे.

हा आसूड फुले यांनी सर्वांवरच चालविला आहे. कारण सर्व जगाचा पोशिंदा असा जो बळी राजा त्याचेच हाल चाललेले आहेत, असे त्यांचे मत होते.

## ५) शेतक-यांची सध्याची परिस्थिती:

शेतकरी वर्गासंबंधी फुले यांना जिव्हाळा होता. शेतक-यांच्या परिस्थितीचे सूक्ष्म अवलोकन केल्यानंतर पदोपदी, शेतक-याला कसे

अपमानास्पद जिणे, हलाखीचे जीवन जगावे लागते याचे त्यांना प्रत्यंतर आले. म. फुले शेतक-याविषयी सांगताना म्हणतात, शेतक-याच्या जिवावर सारा समाज पोटभर खातो आणि अंगभर वस्त्र नेसतो. या शेतक-याच्या जिवावर सारे राष्ट्र चालत असते. मात्र अशा या शेतकरी वर्गाला सर्वजण लुबाडतात, त्यांच्या अज्ञानाचा फायदा घेतात. त्याला शिक्षणापासून वंचित करुन ठेवतात.

या शेतक-याच्या सध्याची परिस्थितीचे वर्णन पुढील प्रमाणे करता येईल, शेतसारा, भटभिक्षुकशाही, पुरोहित, कामगारवर्ग, सावकार, दुष्काळ, रोगराई इत्यादी कारणांने त्याची परिस्थिती ही अत्यंत बिकट व हालाखीची अशी होती. त्याला कंगाल स्थितीत जीवन जगावे लागत होते. कर्जबाजारीपणामुळे शेतीसाठी नवीन त्याला काही करता येत नाही. शेतातून बागाईत पिक घेण्यासाठी मोटा विकत घेता येत नाहीत. ऊस, मका, पिकांची निगा राखता येत नव्हती, की त्याचे हिंस्त्र पशूंपासून संरक्षण करता येत नव्हते. गुरा-ढोरांना जंगलखात्यामुळे पोटभर चाराही मिळत नव्हता. मुले, सुना, बायको व स्वत:लाही अंगभर वस्त्र नाहीत का पोटभर अन्न मिळत नव्हते. आई-वडिलांना मरते समयी काही गोडधोड घालावे म्हटले तर जवळ काही नाही. अशी अत्यंत केविलवाणी अवस्था शेतक-यांची झाली होती. शेतसारा व इतर फंड देण्याच्या पायी जवळ होती ती सर्व जमिन सावकारांच्या ताब्यात गेली, पुन्हा शेतसारा व फंड कसे द्यायचे ही चिंता घरामध्ये होते. त्यांनी ते सर्व किडूक मिडूक विकून शेतसारा भरला होता. सावकार-मारवाडयाची कर्जे वेळेवर न दिल्यामुळे कित्येकांनी कोर्टात केसीस घातल्या होत्या. या तारखांना जाऊन व वकील, कामगार, साक्षीदार यांना पैसे देता देता त्याचा जीव हैराण झाला होता. त्याच्या उत्पन्नाविषयी सांगताना म. फुले

म्हणतात, वारंवार आणी मिळविण्यासाठी शूद्र बिगारी सूर्य उगवल्यापासून मावळेतो उन्हातान्हात बायका पोरासह दगड माती वहात असतो. शिक्षणाच्या बाबतीत म्हणाल तर हा शेतकरी पूर्णपणे अक्षरशून्य असा होता. शिक्षणापासून त्याला वंचित ठेवण्याचे प्रयत्न ब्राह्मणवर्गाने केले. त्याच्याकडून शिक्षण कर घेतला जातो, पण त्याच्या मुलांना याचा काहीही उपयोग होत नाही. शेतक-याला जाणून बुजून शिक्षणापासून वंचित ठेविले जात होते. "शेतकरी विद्वान झाल्यास लक्ष्मीस पुढे घालून आपल्या घरी आणून नांदावयास लावण्याकरिता कधी मागेपुढे पहाणार नाहीत, या भयास्तव या शेतक-यास विद्वान करीत नव्हते."[२३]

अशा हवालदिल झालेल्या शेतक-याच्या आरोग्याच्या दृष्टीने पाहिले तर तिकडे हीच अवस्था "शेतक-याचे घर शेणाने सारविल्यामुळे त्याला घाण येते. शेजारच्या गोठयातील घाण दरवळत असते. स्वयंपाकघरात मातीची भांडी खोलीमध्ये फाटक्या गोधडया आणि चटया, एखाद्या कोप-यात कणगा"[२४] असे असते. शेतक-याचे घर त्याच्या जेवणात जोंधळयाची किंवा नाचणीची भाकरी, रताळी, गाजरे आणि शक्य झाल्यास माशाची आमटी असते. जेवणाच्या वेळी चटणीचा गोळा मात्र वर्षभर न चुकता असतो. हा त्याचा आहार. अशा प्रकारे शेतक-याची सर्व बाबतीतच स्थिती हालाखीची व अतिशय बिकट अशी होती.

म. फुले यांच्या मते सरकारी नोकर व इतर क्षेत्रातील लोकांपेक्षा शेतक-यांचे जीवनमान अगदी खालच्या दर्जाचे होते. त्यातच दारिद्र,

अज्ञान आणि निरक्षरता यांनी भर घातली होती. पुढे म.फुले शेतक-यांच्या दैन्यावस्थेची कारणे सांगतात.

६) शेतक-यांच्या दैन्यावस्थेची कारणे:

ब्रिटीश पूर्वकाळामध्ये शेती मागासलेली होती व शेतक-यांची आर्थिक स्थिती ही बेताचीच होती. ब्रिटीश राजवटीनंतर शेती व्यवसायामध्ये फारसा फरक पडला नाही. शेतीव्यवसायाचा मागासलेपणा बराचसा कायम राहिला. त्याचबरोबर नवीन राज्य, नवे कायदे, नवे अंमलदार यामुळे शेतक-याची पिळवणूक करणारे नवीन काही घटक निर्माण झाले. त्यामुळे शेतक-याची अवस्था अत्यंत बिकट व हालाखीची झाली. शेतक-याला दोन वेळचे पोटभर जेवण सुध्दा मिळेनासे झाले, तो कशी तरी गुजराण करून दिवस काढत होता. अशा प्रकारची ही शेतक-याची दैन्यावस्था होण्यास ब्रिटीश काळात काही खास कारणे होती. असे म. फुले यांनी आपल्या गुलामगिरी व शेतक-यांचा असूड या ग्रंथात या कारणांची सविस्तर चर्चा केली आहे. त्यांच्या मते या हीन अवस्थेची मुख्य कारणे चार होती ती म्हणजे-

१) भटभिक्षुकीतून धार्मिक पिळवणूक
२) लाचलुचपत व भाईभीतजावादू यातून नोकरशाही पिळवणूक
३) व्याज बट्टयातून सावकारशाही पिळवणूक आणि
४) डोईजड शेतसारा आणि ब्रिटीश मालाच्या विक्रीतून होणारी दलाली पिळवणूक.

१) भटभिक्षुकीतून धार्मिक पिळवणूक:

भटशाहीने लादलेल्या सांस्कृतिक गुलामगिरीचाच भटभिक्षुक करीत असलेली धार्मिक पिळवणूक हा भाग होता असे महात्मा फुले यांचे

मत होते. शेतक-यांच्या जन्मापासून ते मृत्यूपर्यंत ग्रामव्यवस्थेतील उच्चवर्णीय ब्राह्मण आपल्या उच्चवर्णियत्वाचा फायदा घेऊन आर्थिक शोषण करतात, हे शोषण "मतलबी धर्माचे लिगाड" शेतक-यांच्या मागे लागून त्याला कळणार नाही अशा पध्दतीने केले जाते. शेतक--याच्या मुलीस ऋतुप्राप्ती झाली की ऋतुशांती केली पाहिजे हे भट-ब्राह्मण शेतक-यांना पटवून देतात, त्या मुलीला निसर्गक्रमानुसार गर्भ राहिला आणि मूल झाले की खोटया कुंडल्या करून जपानुष्ठानाचे निमित्ताने जेवण व पैसे उकळतात." ऋतुशांती निमित्ताने भटब्राह्मणांची उदरशांती होऊन त्यांचे हातावर दक्षिणा पडताच ते शेतक-यास आशिर्वाद दिल्यानंतर त्यास त्यांचे स्त्रियांनी शनिवार अथवा चतुर्थीची व्रते धरावी असेजोन उपदेश करून घरोघरी चालते होतात."[२५] म्हणजे शेतक-यांच्या जन्मापासून नव्हे तर त्याही आधीपासून त्यांच्या शोषणाला प्रारंभ होतो. मुलांच्या लग्नाच्या वेळी, लग्न समारंभात, घर बांधताना आणि मृत्यूच्या वेळीही हे भट-ब्राह्मण लुटावयास तयारच असत. लग्न लावणारे भटजी वधुवरांस खाली समोरासमोर बसवून त्यांचे पुढे नानाप्रकारचे विधि करतात, वेळोवेळी "दक्षिणां समर्पयामि" म्हणाता म्हणाता शेवटी थोडयाशा काडवा सुडया गोळा करून त्यास अग्नि लावून त्याला तूप वगैरे पदार्थ टाकून वधुवरांस लज्जाहोमाच्या निमित्ताने चरचरीत धु-या देऊन त्यांचे अज्ञानी पित्यांपासून अखेरचे भले मोठे शिधे व दक्षिणा घेऊन घरी जातात."[२६]

चैत्रातील वर्षप्रतिदा, रामनवमी, हनुमान जयंती, नागपंचमी, श्रावणी, पौर्णिमा, श्रावणातले सगळे सोमवार, हरितालिका, गणेश चतुर्थी ऋषिपंचमी, अनंत चतुर्दशी, विजयादशमी, अमावास्येची लक्ष्मीपूजा,

बलिप्रतिपदा, तुळशीचे लग्न, मकर संक्रांत, महाशिवरात्री, होळी इत्यादी अनेकविध सण शेतक-यांचे द्रव्यहरण करण्यासाठीच होते. "दर चैत्रमासी वर्षप्रतिपदेस भटब्राह्मण शेतक-यांचे घरोघर वर्षफळ वाचून त्यांज पासून दक्षिणा घेतात. तसेच रामनवमी व हनुमान जयंतीचे निमित्ताने भटब्राह्मण आपले आळीत एकादा सधन शेतकरी असल्यास त्याजपासून अगर गरीब सर्व असल्यास त्यांजपासून आळीपाळीने वर्गण्या जमा करून तूप पोळयांची ब्राह्मण भोजने घेतात."२७

ऐवढे करूनही "शेतक-यांची मस्ती जिरलीच नाही तर" तीर्थयात्रा आणि जत्राखेत्रा होत्याच. जेजुरीचे किंवा पंढरपूरच्या यात्रेत शेतकरी आपल्या मुलांबाळासह तळे किंवा चंद्रभागेत अंघोळ करिते वेळी भटब्राह्मण तेथे संकल्प म्हणून त्या सर्वापासून एकेक शिवराई दक्षिणा घेतात.[२८] तर काही शेतक-यांपासून दहा सुवासिनी ब्राह्मणांस व काही शेतक-यांपासून निदान एक सुवासिन ब्राह्मणास तूप पोळयांचे भोजन देण्यापुरते रकमा उपटतात.[२९] या शिवाय चंद्रग्रहण सूर्यग्रहण होतेच, यामध्ये एखाद्या "कक्केबुवा" किंवा "ठक्केबुवा" भट-ब्राह्मणांनी तयार केलेला असायचा. "कित्येक भटब्राह्मण मोठमोठया देवळांतील विस्तीर्ण सभामंडपात आपल्यापैकी एखाद्या देखण्या ज्वानास कक्केबुवा बनवून त्याचे हातांत चिपळया विणा देऊन बाकी सर्व त्याचेमागे ओळीने तालमृदुंगाचे तालांत मोठया प्रेमाने "राधा कृष्ण राधा" म्हणतां म्हणतां नाच्या पोरासारखे हावभाव करून दर्शनास येणा-या जाणा-या सधन रांडमुंडीस आपले नादी लावून आपली पोटे भरून मोठया मौजा मारितात.[30] एकूण काय शेतकरी म्हणजे या भट-ब्राह्मणांच्या दृष्टीने कायम सोन्याची

अंडी देणारी कोंबडी होती.

धार्मिक विधींचा सुळसुळाट त्याच्या मागे लावून ते त्यांना लुटतात या पिळवणुकीच्या आधार ब्राहमणाकडे असलेली धर्मसत्ता व शुद्रांचा धर्म भोळेपणा हा आहे. "ब्राहमणाचे कसब" व इतर पुस्तकात त्यांचा हा विचार वेळोवेळी येतो. त्यापैकी काही उदाहरणे खाली दिली आहेत.

१) ब्राहमण भोजन तूप चळकळ दक्षिणा तुंबळ आधी बोली।[३१]

२) एका अभंगात वास्तुसांतीच्या वेळी ब्राहमण पुक्टचे ताजे, अन्न व मिष्टान खातात, मात्र बिगारी, गवंडी सुतार या कामक-यांना शिळे अन्न खावे लागते याचे वर्णन आहे.[३२]

३) "भटाची वाणी" या काव्य रचनेत ते लिहितात" आले
उपाधे भट दहा पायाचा घट । जमुनी करी कटकटा हात
पसरती चट। घेती दक्षिणा घट ।। अशी करून लहा।[३३]

४) माळया कुणब्या बोध करुनी रात्री पोथ्या वाचिती।
भलतीच थाप देती। देती सिध्यावर दक्षिणा घेती।।
शुद्राला उघड नाडिती।।[३४]

५) "जळो जळो। तुमचे जिणे। उद्योगाआधी ताजे खाणे।।"[३५]

अज्ञानी शूद्रांना इरेला पेटवून मोठमोठया दक्षिणा व भोजने भिक्षुक उकळतात. आत्माच्या शांतीसाठी पिंडदानहि संस्कार करावयास लावतात. त्यासाठी पैसा नसेल तर शूद्रास त्याचे शेतावर त्यालाच कर्ज देतात आणि ते शेत नवीन गहाणखत करुन आपल्या घशात सोडतात. "भट धनको।। शूद्र ऋणको।। अशी अवस्था प्राप्त होते पण पिळवणुकीचा एक भाग व दैन्यावस्थेचे एक कारण झाले.

२) नोकरशाही पिळवणूक:

ब्रिटीश राजवटीमध्ये कायद्याची अमंलबजावणी व न्यायदान करु शकणा-या अशा कार्यक्षम नोकरशाही यंत्रणेची गरज होती. ही गरज नवे इंग्रजी शिक्षण घेतलेल्या व बौध्दिक कामाची परंपरा असलेल्या ब्राह्मणांनी भागविली. या शासकीय यंत्रणेत सर्व क्षेत्रामध्ये व सर्व पातळ्यावर त्यांनी शिरकाव केला. वकील, न्यायाधीश, फौजदार, बेळीफ, मामलेदार, कुलकर्णी, डॉक्टर, इंजिनिअर, शिक्षक व शिक्षणाधिकारी इत्यादी सर्व जागांवर त्यांची भरती झाली.

म. फुलेंच्या मते सरकारी दप्तराचे काम या कुलकर्ण्याकडे त्या ब्राह्मणानेच सोपविले होते आणि आजपर्यंत तीच प्रथा चालू असल्याने हे ग्रामराक्षस शूद्रांच्या मागे हात धुऊन लागलेले आहेत. शेतक-यांची वतने त्यांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन हे कुलकर्णी लुबाडतात. लिहिता वाचता न येण्यामुळे अशा कलमकसाया करणे भट-कुलकर्ण्याला साधू शकले. अज्ञानी शूद्रास गहाणखत वाचून दाखवताना निराळेच दाखवायचे आणि प्रत्यक्षात वेगळेच करुन जेणे करुन त्याची जमीन लाटता येईल असे तयार करायचे असा त्यांचा राजरोसचा धंदा झाला होता. शेतक-याला ठकवण्यात, लुबाडण्यात केवळ कुलकर्णीच नव्हे तर मामलेदार, चिटणीस वगैरे प्रत्येक क्षेत्रातील भट अधिकारी सहभागी असत. खोटे रिपोर्ट, खोटे अर्ज, खोटया साक्षी, खोटी गहाणखत करुन गरीब शूद्रांचे अर्ज कलेक्टर, रेव्हिन्यू साहेबांपर्यंत पोहोचण्यापूर्वीच दाबून टाकणे खटल्याचे स्वरुपच आमुलाग्र बदलून टाकणे अशा असंख्य युक्त्या आणि क्लृप्त्या योजण्यात ते आपली अक्कल खर्ची घालत असत. शेतक-यांच्या वास्तविक स्थितीबद्दल

माहिती करून घ्यायला ऐष आरामात गुंग असलेल्या गो-या अधिका-यांना सवडच होत नाही. त्यामुळे त्यांच्या गाफीलपणाचा फायदा ब्राह्मण कामगार घेत होते. त्यांच्या प्रबल्यामुळे शेतक-याच्या लुटीला धरबंद न राहाता पोटभर अन्नास व अंगभर वस्त्रास तो मोताद होता.

इंजिनियर खात्यातील भटकामगारही शूद्रादी अतिशूद्रांना कसे लुबाडतात याविषयीही फुले यांनी पोवाडा केलेला होता. ते म्हणतात, फाजील हज-या भरून असलेल्यांचे खाडे मोडून अशा नाना लटपटी करून ते पैसे खातात. पांडयाचे सा-या महिन्याचे फक्त बारा दिवस दाखवतात आणि अशा दिवसांची हजेरी स्वत:च्या खिशात घालात. हजेरी दाखवायला पगारा दिवशी माणसे गोळा करून त्यांच्या हातावर पावली टिकवायची आणि उरलेला ऐन माल आपण गट्ट करायचा. आपल्या आप्त स्वकीयांना काम न करताच असा खोटा व्यवहार करून दाम घायचा, बैल असणा-या भिस्त्यालाही हेच माप.

"मधीच कधी भोजन देऊन मिंधा करिती ।
कसी पहा संधि साधिती ।।
जेऊ घालतां स्त्री सुचवी सरपणाची कमती ।
पतीला सोडून कळविती ।।[३६]

कामावर येणा-या बिगा-याला भोजन देऊन मिंधे करायचे आणि मग त्यांच्याकडून घरची कामे करून घ्यायची. साहेबासाठी लागणारी कोंबडी सुध्दा बिगा-याच्या पगारातून कापली जायची. इंग्रज अधिकारी तर काम नुसत्या सहयाचे अधिकारी, शिकार, मद्यापुढे त्यांना कुणाची चिंता ? सारा भार भटांवर सोपवून ते निश्चिंतच.

ठेपले गोरे येऊन । कचेरी तंबू घेऊन ।
थकले शिकार खेळून । कागदी सहया करून ।
भटावर बाकी सोंपून । विसावा ग्लास घेऊन ।[३७]

थोडक्यात विविध खात्यातील कारकून व खेडयातील भट-कुलकर्णी यांनी शूद्रावर अनिवार अन्याय केला. म्हणूनच त्यांना म. फुले संतापाने "कळम कसई" आणि "ग्रामराक्षस" अशा पदव्या दिल्या होत्या. या ब्राह्मण शाहीचे विदारक वर्णन पुढील काही प्रसंगाने फुलेने केले होते.

"खेडेगावी कुलकर्णी । आहे लेखणीचा धनी ।
महालामध्ये म्हालकरी । जसा अष्ट अधिकारी ।।
यमवत मामलेदार । शूद्राशिक्षा अतिवार ।।
रेवेन्यूची दफ्तरदारी । ब्रह्मण किती अधिकारी ।।[३८]

नोकरदार बनलेल्या ब्राह्मण जातीने असा "कावा" केला की दुस-या जातीस नोकरीत प्रवेश मिळू द्यायचा नाही आणि या नोकरशाही अधिकाराचा उपयोग लाच घेऊन शूद्र रयतेचे द्रव्य लुटण्यासाठी करावयाचा. ब्राह्मण लाच घेतल्याशिवाय काही काम करीत नाहीत अशा प्रकारच्या तक्रारी त्यांनी नोंदून ठेविल्या आहेत.

१) "ब्राह्मणांच्या हातावर अमुक तमुक ठेवल्याशिवाय ते गरिबांच्या कामाला हातच लावीत नाहीत" ।। [३९]

२) "सडकेच्या कामावर बिगारी म्हणून लावल्यास भट अधिका-याची मूठ गार केली नाही तर ते वरच्या अधिका-याना चहाडया सांगतात.[४०]

३) "इरिगेशन खात्यात पैसे घेऊन मजूर लावतात. भरपूर पैसा करवून हवेल्या बांधतात.[४१]

या नोकरशाही अधिकाराचा हे ब्राह्मण आपल्या भट भाईच्या फायदयासाठी व शूद्राविरोधी कारवाया करण्यासाठी कसा वापर करतात याचे काही किस्से म. फुल्यांनी सांगितले आहेत.

१) "भट मामलेदार भट भाईची कामे करण्यासाठी पुण्यासारख्या ठिकाणी देखील 'झोटिंग बादशाही' करतात।"[४२]

२) "कोणी म्हणतो भट चिटणीसाने माझा अर्ज क्लेक्टरास वाचून दाखवितेवेळी त्यातील मुख्य भाग कलम गाळून त्याजकडून भट मामलेदाराने केलेला निकाल कायम करविला.[४३]

३) "अन्याया विरुद्ध फिर्याद दाखल केल्यास हे सर्व भरपाई कागदपत्राची स्वरूपे बदलून न्याय मिळू देत नाहीत."[४४]

३) व्यापारी व सावकार यांच्याकडून होणारे शोषण:

ब्रिटीश मालामध्ये दलाल व्यापारी व सावकार असे दोन वर्ग जन्मास आले. औद्योगिक मालाची विक्री करण्यासाठी व कच्चया मालाचा पुरवठा करण्यासाठी बाजारपेठा तयार केल्या होत्या. हे काम करणारा मध्यस्थ दलाल व्यापारी तयार झाला होता. तो खरेदी विक्रीच्या व्यवहारात दलाली खात तसेच नडलेल्या शेतक-यांना व्याजाने कर्ज देत होता. शेतसा-याचा भरणा, बी-बियाण्यासाठी लागणारे भांडवल, लग्नादि धार्मिक विधीतील दक्षिणा, दुष्काळ व अन्य इतर बाबीसाठी शेतक-यांना वेळोवेळी कर्जे काढावी लागत होती. मारवाडी, व्यापारी, शूद्र गि-हाईकांना तर भट-सावकार यजमानांना कर्ज देत होते. अशा प्रकारे ब्राह्मण-मारवाडी-जाती सावकारी करत होते. शूद्र शेतक-यांच्या अज्ञानाचा व धर्मभोळेपणाचा फायदा घेऊन हे सावकार शेतक-यांच्या

जमिनीवरील माल व्याजापोटी हजम करीत. त्याच्या अशिक्षितपणाचा फायदा घेऊन दामदुपटीने व्याज गहानवर केलेल्या जमिनीवर आपला कब्जा बसवीत व त्याच जमिनीवर मूळ जमिन मालकाला कूळ म्हणून राबवित. अशा प्रकारे सावकार शाहीतूनच गैरहजर जमीनदार तयार होत होते. जोतीरावांच्या लिखाणात शेतक-यांच्या कर्जबाजारीपणाचा व त्यांच्या ब्राह्मण-मारवाडयांकडून होणा-या शोषणाचा वारंवार उल्लेख येतो.

१) "हिशोबी घोळ। सर्व गोंधळ ।।
वाढती कर्ज डोईवर। आतुनी होई सावकार ।।
पैसा देईना गहानावर। केळ पाहून संधी साधून ।।
मागणी ने त्यावर। तगादा धाडी पाठीवर।।
दामदुप्पट सर्व एकवट। नोंदिती गहाण खतावर।।
दुमला पुस्त रजिष्टर।।
हातावर देई। लिहून घेई।।
वायदा आट स्टांपवार। ठोकली अर्जी अखेर।।
धन्यावर जीव। केली मोठी कींव।।
बक्षिस बीन भाडे घर। शहाणा ठक आरपार।।[४५]

२) "भट धनको। शूद्र ऋणको।।
कर्ज शेतीवर काढणे। भोजन जातीला दिले।।
थोडया दिवसात। व्याज मुदलात।।
गहान खत चोख नवे केले।।
मिराशी भट्ट वारस झाले।।[४६]

३) "तगाआची तुम्ही वाट पाहू नका ।।
मारा बोंबा हाका जोशा नांवे ।।
व्याज बट्टया सुध्दा नाटक्याची बाकी ।।
फेडा बीनचुकी रोखारोखी ।। ४७

यातच भर म्हणजे महाराष्ट्रातील बहुतांशी शेती ही पावसावरच आवलंबून होती. त्यामुळे अधून मधून पावसाने धोका दिल्यास शेतक-यास कर्ज फेडणे कठीण जात होते, यामुळे सर्व स्वामावण्याची पाळी शेतक-यांच्यावर येत होती. यासंबंधी जोतीबा म्हणतात, "त्यावेळेस त्या सरकारात फिर्याद करावी लागत नसे कारण त्यांचे (सावकारांचे) घरातच सरकार होते. मनास वाटेल त्याप्रमाणे कुळास मारावे झोडावे त्याचा सर्व माल हिसकाऊन घेऊन जावा, त्याची बैल ढोरे विकावी, त्याच्या मुलामाणसांचे हालहाल करावे, त्याचे डोक्यावर अथवा पाठीवर मोठे धोरले धोंडे देऊन भर उन्हामध्ये उभे करावे, शरीराचे नाजूक भागास चाप लावावेत. कोलदंडा घालून मार द्यावा, सात आठ रुपयाचे रकमे करिता शेत, गुरे-ढोरे, विहीर, मळे सर्व काही जाई आणि याचा परिणाम म्हणजे शेत्की तोही देशोधडीला किंवा प्राण त्याग करी. ४८

वरील प्रमाणे सावकार शेतक-यांची लुबाडणूक, आर्थिक पिळवणूक व्हायचे कारण त्यावेळचे बहुतेक शेतकरी अशिक्षित व अंध-श्रध्दाळू होते. धार्मिक आचार व सामाजिक प्रथा याबद्दल त्यांना फार आदर वाटायचा. ते ब्राह्मण व सावकार विरुध्द कधी जात नव्हते. यातच त्यांना सरकारचीही साथ होती.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR
KOLHAPUR

४) सरकार:

जोतीरावांचे असे मत होते की, भट ब्राह्मणांच्या नादाने सरकार देखील शूद्राची लूट करीत आहे. ब्रिटीश व ब्राह्मण अधिकारी शेतसारा वाढवून,[४९] जकात बसवून,[५०] ब्रिटीश मालाचा खप वाढवून,[५१] धान्य, कापूस, कातडी व लोकर याची निर्यात करुन,[५२] रयतेचे द्रव्य उधळीत आहेत त्यातून सरकारी अधिका-यांचे मोठाले पगार व निवृत्ती-वेतन दिली जात आहेत,[५३] या सर्व बाबीकडे सरकार दुर्लक्ष करिते म्हणून त्यांनी त्यास "आंधळे" ठरविले आहे ते म्हणतात,

"गरीब शूद्रावर कहर। हे पहा करीती जोजार।। "
असे आंधळे सरकार.[५४]

थोडक्यात ब्राह्मणशाही धर्म, नोकरशाही व सावकारशाही या सत्तानयींच्या मार्फत व सरकारला "आंधळे" करुन शूद्र कुणब्यांची आर्थिक पिळवणूक करीत होती. या द्रव्याच्या अर्थ लोभातून (ब्राह्मणांच्या द्रव्य लोभातून) व सरकारच्या आंधळेपणामुळे चहूकडे भटभाई। कुणब्याची दाद नाही,[५५] अशी परिस्थिती तयार झालेली होती. अशा प्रकारे ब्राह्मण व कुणबी यामध्ये अर्थ लोभ मूळ तंटयाचे कारण आहे.[५६] हे त्यांनी समप्रमाणे सिध्द करुन दाखविणे.

ब्रिटीश पूर्व कालामध्ये ज्या शेतक-यांजवळ थोडी जमिनी होती ते शेतकरी उदरनिर्वाह करण्यासाठी डोंगरावरील द-याखो-यांतील जंगलातून उंबर, जांभूळ इत्यादी झाडांची फळे खाऊन व पळस, मोहा इत्यादी झांडाची फुले, पाने आणि जंगलातून तोडून आणलेल्या लाकूड फाटा विकून काही पैसा मिळवित असत. प्रत्येक गावात पूर्वी गायराण

आले नाही तरी तो द्यावा लागे हा शेतसारा ठराविक मुदतीत एकदाच ठरविला जाई. त्यामुळे शेतक-यांची आर्थिक पिळवणूक होते, त्याला कर्ज काढल्याशिवाय गत्यंतरच नाही असे म. फुले म्हणतात, या विषयीची त्यांची तळमळ वेळोवेळी दिसून येते.

१) शूद्र दीनबंधू शेतीत खपतो ! ।। कुटुंब पोषीतो ।। बैलासह ।।
सा-यासह वारी लोकलफंडास ।। घाली भरतीस । कांही धान्य ।।
गोळा सर्व फंड इंग्रज करीती ।। गो-या थापा देती । जोती म्हणे ।।[६]

२) "सा-यासह फंड शूद्र किती देती । धूर्त आर्य खाती । शाळा खाती ।।
शूद्रादीक त्यांनी किती शिकवलि । कामगार केले । दावा आम्हां ।।
शूद्रसाठी गोरे मनांत झुरती । भटा जागा देती । जोखमीच्या ।।
शूद्राजी थकले फंड देता देता । भटास पोशीती । जोती म्हणे ।।[६१]

शेतकरी आपल्या कुटुंबासह शेतावर दिवसभर काम करुन जे काही मिळवतो ते त्याला सर्व सारा भरण्यासाठी इंग्रजांच्या खजिन्यात भरावे लागत होते. मात्र एवढे करुन ही शेतक-यांच्या मुलांना शाळा शिकविल्या जात नव्हत्या, त्यांना नोकरीमध्ये स्थान नव्हते, सर्वत्र फायदा मात्र ब्राह्मण वर्गाचाच होत होता.

थोडक्यात शेतक-यांच्यावर तर आई येऊ देईना आणि बाप भिक मागू देईना अशी वेळ आलेली होती. जन्मापासून मृत्यूपर्यंत सोबत करणा--या भटांच्या लुबाडणुकीतून, गुलामगिरीतून मुक्त व्हावे, त्यासाठी मदत करणा-या इंग्रज सरकारकडे मदतीच्या अपेक्षेने पहावे तर त्याने डोळयावर पट्टी बांधलेली. भटांच्या डोळयांनी सरकार पहाणार, भटांच्या कानांनी सरकार ऐकणार म्हटल्यावर शेतक-याला न्याय काय मिळणार ! लोकलफंड

होते. या गायराण्यावर अवलंबून काही शेतकरी, गायी व एकाद दुसरी म्हैस किंवा शेळया चरीत व आपली कशी तरी गुजराण करीत. मात्र येथे इंग्रज सरकार आल्याबरोबर त्यांनी एक नवीन जंगल खाते सुरु केले यामुळे तेथील वाळल्या पाचोळयावर पाय देणे म्हणजे सुध्दा गुन्हा ठरु लागला. यामुळे शेतक-यांचा दुय्यम धंदाच बुडाला. फुले म्हणतात "आमचे मायबाप सरकारचे कारस्थानी युरोपियन कामगारांनी आपली विलायती अष्टपैलू अक्कल खर्ची घालून भले मोठे टोलेजंग जंगलखाते नवीनच निर्माण करुन त्यामध्ये एकंदर सर्व पर्वत, डोंगर, टेकडया, दरी खोरी व त्याचे भरीस पडित जमिनी व यायराने घालून फारेष्ट खाते शिखरास नेल्यामुळे दोन दुबळया पंजु शेतक-याचे शारडाकारडांस या पृथ्वीवर रानचा वारासुध्दा खाण्यापुरती जागा उरली नाही."[५७] याविषयी लोकहितवादी ही लिहितात, "सरकारच्या जंगल संबंधी कायद्याने सर्व अरण्यास कुलपे घातल्याने रानावनातली गवतकाडी, लाकूडफाटा, पानपाला वगैरे माल मुबलक मिळण्याची मोठी पंचायत झाली आहे."[५८]

दादाभाई नौरोजी ब्रिटीश अर्थनितीची मीमांसा करुन हिंदू-स्थानच्या वाढत्या दारिद्र्याची कारणे सांगितली होती. ते म्हणतात "इंग्लडच्या हिंदुस्थानांतील भांडवलावरील व्याज, लष्करावरील अफाट खर्च, हिंदूस्थान सरकारची इंग्लंडमधील खरेदी आणि इंग्रज अमंलदारांचे पगार व पेन्शने याखातर हिंदूस्थानातून प्रतिवर्षीक कोटयावधि रुपये इंग्लंडला जातात. त्याने भारताच्या संपत्तीला गळती लागली असून तो दिवसानुदिवस अधिका-धिक दरिद्री बनत चालला आहे."[५९] त्यामुळे शेतक-यांची अवस्था ही इतरांच्या पेक्षा अधिकच बिक्ट बनत गेली होती.

ब्रिटीशांनी नवीनच लागू केलेला शेतसारा दुष्काळ पडला, पिक

शेतसारा, पट्टयाच्या भाराखाली पिचलेल्या शेतक-याला मिठ भाकरी खावी म्हटली तर त्या मिठावर सुध्दा कर भरावा लागत होता.

७) म. फुले यांनी सांगितलेली उपाययोजना:

शेतक-यांची स्थिती सुधारण्यासाठी म. फुले यांनी सुचविलेले उपाय पाहिले कि त्यांच्या चौफेर दृष्टीचा प्रत्यय आपणास येतो. त्यांच्या सूक्ष्म निरिक्षणांचा आणि समस्यांच्या संदर्भात सर्वांगीण विचार करण्यासाठी म. फुले उपाय सांगताना म्हणतात की, शेतक-यांच्या भोवती आर्थिक शोषण करणारे घटक होते त्यांच्यामध्ये प्रथम जागृती करण्याचा प्रयत्न केला पाहिजे असे त्यांचे मत होते. यामध्ये प्रामुख्याने १) भिक्षुकशाही विरुध्द जागृती, २) नोकरशाही विरुध्द जागृती, ३) सावकारशाहीवर नियंत्रण, ४) सरकारला काही सूचना.

१) भिक्षुकशाही विरुध्द जागृती:

म. फुले सांगतात की अज्ञानी व अंधश्रध्दाळू शेतक-यांची सर्वात जास्त पिळवणूक भिक्षुकशाही कडून होत आहे. त्यांच्याकडून अनेकविध युक्त्या योजून शेतक-याला मोठया प्रमाणात लुबाडले जाते. हे थांबविण्यासाठी भिक्षुकशाही विरुध्द शेतक-यांच्या मनात जागृती करणे आवश्यक आहे. त्यासाठी त्यांना शेतक-यांच्या शोषणामुळे तो कसा नागवला जाऊन अन्नास महाग बनतो. त्याला अंगभर वस्त्रही मिळत नाही याची जाणीव करुन दिली पाहिजे. भिक्षुकशाहीने लादलेल्या सांस्कृतिक गुलामगिरी विरुध्द शेतक-यांनी उठाव करावा,

बंड पुकारावे अशी फुले यांची शिकवण होती. कारण भिक्षुकशाही सांगत असलेला धर्म हा पूर्णत: खोटा आहे. त्यामुळे शूद्र शेतकरी अज्ञानी बनलेला आहे. म्हणून शेतक-यांच्या मनामध्ये त्यांच्या हक्काबद्दल जागृती निर्माण करुन त्यांना भिक्षुकशाहीने शिकविलेल्या मिथ्या धर्माविरुध्द उभे करणे गरजेचे आहे. शेतक-यांची मुक्ती जर अभिप्रेत असेल तर ती वैचारिक मुक्तीशिवाय होणार नाही असे फुले यांचे मत होते.

२) नोकरशाही जागृती:

शूद्र, अतिशूद्र शेतक-यांची नोकरशाहीकडून अडवणूक व शोषण होते असे, म. फुलेंचे मत होते. त्यासाठी ते सांगतात की, या नोकरशाही मध्ये ब्राह्मणांचे वर्चस्व आहे आणि ते आपल्या जात भाईचे स्वार्थ पाहातात, म्हणून एकाच जातीतून जी नोकरभरती होते ती बंद करण्यात यावी. प्रत्येक जातीस संख्येप्रमाणे [illegible] जागा मिळण्यासाठी माळी, कुणबी, शूद्र यांच्या मुलांना शिक्षण देऊन त्यांना नोकरशाहीत स्थान द्यावे. मग ते ब्राह्मण अधिका-यांची शोटिंग बादशाह चालू देणार नाहीत. त्याचप्रमाणे वरिष्ठ इंग्रज अधिका-यांनी लोकांच्या कल्याणार्थ कमी ऐष आराम करावा व राणी सरकारचे कर्तव्य पार पाडावे. तरच नोकरशाहीतून हे जे शेतक-यांचे शोषण होत आहे ते कमी होईल.

३) सावकारशाही जागृती:

सावकारांच्याकडून होणा-या कर्ज पुरवठयावर ते मोठया प्रमाणात व्याज घेतात व या व्याजावर शेतक-यांच्यावर एवढा मोठा बोजा पडतो की तो कधी कर्जमुक्तच होत नाही तर त्याच्या जमिनी

हळूहळू सावकारांच्या ताब्यात जातात त्यामुळे शेतक-यांच्या उत्पन्नाचे एकमेव साधन ही हातून निघून जाते, यामुळेच त्याला जगण्यास दुसरे उत्पन्नाचे साधन राहात नाही. त्यासाठी इंग्रजांनी त्याकडे नीट लक्ष द्यावे. त्याचबरोबर शेतक-यांच्या अज्ञानामुळेच सावकार त्यांना लुबाडतो. म्हणून शेतक-यांना विद्या द्यावी. म्हणजे त्यास आत्मस्थितीचे व्यवस्थित ज्ञान होईल.

४) सरकारचा दृष्टीकोन बदलणे:

म. फुलेंच्या मते सर्वात प्रथम आपण सरकारला समजावून सांगितले पाहिजे कि शेतकरी व कष्टकरी यांची अवस्था कशी दयनीय आहे व या दयनीय अवस्थेस भिक्षुकशाही, नोकरशाही व सावकारशाही कशी कारणीभूत आहे. यात ब्राह्मणांचे वर्चस्व असल्यामुळे ते शेतक-यांचे चोहोबाजूनी कसे शोषण करतात हे सरकारला पटवून दिले पाहिजे.

वरील प्रमाणे जागृती करून शेतक-यांचे होणारे आर्थिक शोषण थांबविणे शक्य नसल्यामुळे म. फुले सांगतात कि शेतक-यांच्या मध्येच यासाठी काही मूलभूत बदल घडवून आणणे आवश्यक व यासाठी फुलेंच्या मते शेतक-यांच्या मध्ये १) विद्येचा प्रसार, २) सत्यधर्माचा प्रसार व ३) अज्ञान दूर करणे या गोष्टी केल्या पाहिजेत.

१) विद्येचा प्रसार:

"ज्ञान ही एक शक्ती आहे, शिक्षण हे सार्वत्रीण सुधारणेचे प्रवेशद्वार आहे" या सुवचनांवर म. फुले यांचा दृढ विश्वास होता. म्हणून म. फुलेंनी आपल्या लेखनात आणि सत्यशोधक समाजाच्या चळवळीत शिक्षण

प्रसाराच्या कामाला महत्त्वाचे स्थान दिले होते. शेतक-यांचे वाढते दारिद्र, धर्मभोळेपणा, प्रतिकूल परिस्थितीचे आघात, ब्राह्मणांचे वर्चस्व, भटभिक्षुकांचे महात्म, ब्रिटीश राज्यातील कायद्याचे ज्ञान, सरकारी अमंलदार व सावकार यांच्याकडून होणारी फसवणूक इत्यादी गोष्टीबाबत अज्ञानी, निरक्षार शेतक-यांची फसवणूक थांबविण्यासाठी त्यांच्या मध्ये विद्येचा प्रसार झाला पाहिजे असा आग्रह म. फुले यांनी धरला होता. शेतकरी व त्यांची मुले शिकून त्यांना लिहिता वाचता येऊ लागल्यास त्यांची पिळवणूक थांबेल यासाठी फुलेनी शिक्षणाचा आग्रह धरला होता. "शेतकरी समाजातील सर्व लोकांना बंधमुक्त करुन त्यांना आपले नैसर्गिक मानवी अधिकार नि:शंकपणे उपभोगण्यास समर्थ बनविते.[६२] यासाठी फुलेनी शिक्षणाचा आग्रह धरला हे शिक्षण देताना शेतक-यांची परिस्थिती व प्रश्न यांना प्राधान्य देऊनच येथील शिक्षणाचा विचार केला पाहिजे असे फुलेंचे मत होते. यासाठी १२ वर्षापर्यंत शेतक-यांच्या मुलांना सक्तीचे शिक्षण, त्यांना शिकविण्यासाठी त्यांच्यातीलच शिक्षक नेमणे, त्यांना योग्य ते वेतन देणे इत्यादी गोष्टींची शेतक-यांना शिक्षण देताना नोंद घेणे आवश्यक आहे असे म. फुलेंचे मत होते.

२) सत्यधर्माचा प्रसार:

अज्ञानी शेतक-यांच्यामध्ये शिक्षणाबरोबरच सत्यधर्माचा प्रसार करणे आवश्यक आहे असे फुले म्हणतात कारण सत्यधर्मामध्ये मानवजातीच्या एका विभागाचे नव्हे तर सर्व मानवजातीचे सुख साधण्याचे उद्दिष्ट या सत्यधर्माचे आहे. सर्व सृष्टीचा व म्हणून सर्व माणसांचा एक निर्माण कर्ता आहे. ह्या निर्मिकाने प्रत्येक मानवी व्यक्तीला काही मानवी अधिकार

देऊन निर्माण केले आहे, ह्या मानवी अधिकारांचा उपभोग घेण्यात व्यक्तीचे सुख असते. तेव्हा ज्या पध्दतीने वागले असता प्रत्येक व्यक्तीला तिच्या मानवी अधिकारांचा निर्वेधपणे उपभोग घेता येणे शक्य होईल. अशा रितीने वागणे म्हणजे सत्यधर्माने वागणे होय. अशा प्रकारची जाणीव शेतक-यांच्या मध्ये निर्माण झाल्यावर तो सत्याने जिवण जगेल, अंधश्रध्दा बाजूला सारेल व भटभिक्षुकांच्या नादी लागणार नाही म्हणून फुलेंनी सत्यधर्माचा प्रसार शेतक-यांच्यातील अज्ञानपणा घालविण्यासाठी आवश्यक होता, यामुळे ईश्वराविषयक चुकीचे ग्रह निर्माण करण्या-या मूर्तिपूजेसारख्या उपासना पध्दतीचा, शास्त्रोक्त पूजविधीला, धर्मकृत्यामुळे द्रव्याची होणारी नासाडी, धर्म ही कोणत्याही एका वर्गाची मिरासदारी नाही याची जाणीव शेतक-यांचेमध्ये निर्माण होईल.

३) अज्ञान दूर करणे:

म. फुलेंनी विद्येचा व सत्यधर्माचा प्रसार याशिवाय त्यांच्या उन्नतीसाठी इतर ही काही मार्ग सांगितले आहेत. त्यामध्ये त्यांचे अज्ञान दूर करणे, त्यांना काही वाईट गोष्टी पासून परावृत्त करणे याचा समावेश होतो. म. फुले म्हणतात "शेतक-यांनी चो-या, छिनाल्या करु नयेत, गैरशिस्त आचरणाने त्यांची प्रकृती बिघडू नये यासाठी त्यांना योग्य शिक्षा करुन बंदोबस्त करणा-या डिटेक्टिव्ह डॉक्टरांची नेमणूक करुन त्यांचा अज्ञानपणा घालविला पाहिजे तरच ते शेतकरी नीतीमान होतील. शूद्र शेतक-यांनी एका पेक्षा जास्त बायका करु नयेत व आपल्या मुलांची लग्ने लहानपणी करु नयेत म्हणून कायदा केला पाहिजे. तरच त्यांची संतती बळकट व सुदृढ होईल. ब्राह्मणांच्या कृत्रिम धर्माची छाप अज्ञानी शेतक-यांवर इतकी असते की त्यांनी केलेले गुन्हेच नव्हे तर खून सुध्दा

शेतकरी आपल्या माथी घेऊन त्याबद्दल शिक्षा भोगण्याचे पुण्यकर्म केल्याचे समाधान मानतो, यामुळे पोलीस व न्याय खात्याचे श्रम व पैसा वाया जातो. यासाठी त्यांचे अज्ञान घालविणे आवश्यक आहे. यासाठी शूद्र शेतक-यांच्या मुलांना विद्वान करण्यासाठी स्वतः शेतीत पाभारी, कोळपी व नांगर हाकून दाखविणारे शिक्षक तयार करुन त्यांच्याच शाळेत शेतक-यांनी आपली मुले पाठविण्याचा कायदा करावा याशिवाय त्यांच्यातील अज्ञानपणा दूर होणार नाही. परजातीने अज्ञान शेतक-यांच्या मुलामुलींच्या लग्नात लग्नविधीसाठी जुलूम करु नये, शिक्षकांच्या शाळेतील सद्गुणी मुलांसच पाटिलक्या मिळतील, तसेच अज्ञानी शूद्रांची मुले शिकून तयार होतील तसतसे त्यांना मामलेदार, सरकारी कचे-यातील लहान मोठया जागा देऊन त्यांना ती कामे करण्यास शिकवल्याशिवाय एकूणच शेतक-यांच्यातील अज्ञानीपणा नाहिसा होणार नाही.

म.फुले प्रणित शेती सुधारणा:

वरील प्रमाणे महात्मा फुलेनी जे काही उपाय शेतक-यांची स्थिती सुधारण्यासाठी सांगितलेले आहेत त्यामुळेच शेतकरी स्थिर होऊन उत्पन्न वाढेल व त्यांची होणारी आर्थिक पिळवणूक थांबेल व सरकारचा वसूलही वाढेल. तसेच त्यांनी शेतीची निकोप प्रगतीसाठी सविस्तरयोजना मांडली त्यातील काही महत्त्वाचे उपाय पुढील प्रमाणे:

१) शेतीची योग्य प्रकारे मशागत करता यावी म्हणून चांगल्या जातीच्या गायी व बैलांची पैदास करावी, गाई न मारण्याचा कायदा करावा.

२) डोंगर टेकडयावरील गवत, पालापाचोळा मेलेल्या कीटक, श्वापदांचे हाडामांसाचे सत्त्व, पानाफुलांचे कुजलेले सत्त्व पावसाच्या पाण्याबरोबर वाहून ओढया नाल्यात जाऊ नये म्हणून जागोजाग तालीवजा बंधारे बांधावेत.

३) डोंगर टेकडयामधील द-याखो-यात तलाव तळी जितकी होतील तितकी काळे-गोरे लष्कर व पोलीस खात्यातील फालतू शिपायाकडून बांधून घ्यावीत म्हणजे विहीर व तळयांना पाणी राहून बागायत वाढेले.

४) सरकारने विहीरी बांधण्यासाठी पाणथळ जागा शोधून काढाव्यात, खाजगी क्षेत्रात लोकांना विहीरी खणण्यास प्रोत्साहान द्यावे.

५) नदीनाले व तळयातील साचलेला गाळ शेतक-यांना फुकट नेऊ द्यावा.

६) ज्या गावची गायराने फॉरेस्ट खात्यात समाविष्ट केली असतील ती त्या त्या गावांन परत करावीत.

७) उत्तम प्रकारच्या शेळया मेंढयाची निपज वाढवावी.

८) धूप होऊन शेतीचा कस कमी होईल म्हणून ताली बांधाव्यात.

९) शेतक-यांच्या मुलांना सुतारकाम व लोहार काम शिकविण्यासाठी प्रोत्साहन द्यावे, त्यांना सरकारी खर्चाने विलायतीस शेतकीच्या शाळा पहाण्यास पाठवावे.

१०) शूद्र मजूरांचे पगार वाढवावेत.

११) शेतक-यांची नैतिक पातळी व निकोप शारीर प्रकृतीसाठी सरकारने जोगतीण, आराधिनी, मुरळया, कोल्हाटिणी, कसबिणी, तमासगिर, नाटककार, कथाडे इत्यादिवर बंदी घालावी.

१२) सरकारने शेतक-यांच्या बंदुका, बर्च्या, जप्त केल्या आहेत तेंव्हा रानडुकरांपासून शेतीचा बचाव करण्यासाठी गावठी तोंडाच्या बंदुका शेतक-यांना ठेवण्याची परवानगी द्यावी, नाहीतर शेतीच्या नुकसानी बद्दल पोलीस अमंलदाराना जबाबदार धरावे.

१३) जमिनीवर कराची योग्य आकारणी करावी.

१४) शेतमजूरांच्या मुलांना पुस्तके, पाटया व कपडे पुरवावित.

१५) सरकारी हद्दतील सरपण व शेताला राब याशिवाय इमारती लाकडे तोडण्यास बंदी करावी. फॉरेस्ट खाते बंद करून टाकावे.

१६) शेतक-यांवर देखरेख करण्यासाठी सदवर्तनी अधिकारी नेमावेत. त्यांनी अयोग्य वर्तन करणा-या शेतक-यांना शिक्षा द्याव्यात.

१७) मारवाडी व व्यावसायिक लोकांच्यावर देखरेख ठेवावी.

१८) शेतक-यांना शेती सुधारण्यासाठी शेतीसंबंधीचे अत्याधुनिक ज्ञान द्यावे त्यासाठी तत्संबंधीचे ग्रंथ उपलब्ध करून द्यावेत.

१९) सरकारने हलक्या पगारी चाकरांच्या पगारात काडीमात्र फेरफार न करता काळया व गो-या कामगारांचे मोठमोठे पगार, पेन्शनी कमी करावेत.

२०) शेतक -यांना शेतीविषयक प्रशिक्षण द्यावे. दरसाल प्रदर्शने भरवावीत. शेती शिक्षण घेणा-यांनापदव्या द्याव्यात. प्रगत शेतक-यांना पदवी व बक्षिसे देऊन सन्मान करावा."[६३]

म. फुले म्हणतात, "शेतक-यांच्या व त्यांच्या शेतीसाठीच्या वरील सुधारणा अंमलात आणल्या खेरीज सरकारचे राज्य इथे मजबूत होणार नाही. तसेच शेतक-यांचे उपास आणि त्यांच्या कपाळाची लंगोटीही सुटणार नाही."

वरील प्रकारच्या सुधारणा अंमलात आणावयाच्या झाल्या तर त्यासाठी सरकारने योग्य अशी पाऊले उचलली पाहिजेत. पण त्यासाठी

योग्य त-हेचे राजकारण केले पाहिजे. कारण फुले यांना अभिप्रेत असणारे राज्य हे शेतक-यांचे लोकशाही राज्य होते. त्याकाळी स्थापन झालेल्या ब्राहमणांनी ज्यावर संपूर्ण नियंत्रण केलेले आहे अशा काँग्रेस पक्षाकडून [illegible] अपेक्षित नव्हते.

८) शेतीसुधारणा व तत्कालीन राजकारण:

ब्रिटीशांची राजवट महाराष्ट्रामध्ये स्थापन झाल्यावर शेतीव्यवसायातला मागासलेपणा घालविण्याच्या दृष्टीने येथील शेतीमध्ये मूलभूत सुधारणा करण्याचा प्रयत्न ब्रिटीश राजवटीने केला नाही. शेतीत काही जुजबी सुधारणा करुन जास्तीत जास्त पैसा या व्यवसायातून मिळवणे व मुख्य उद्देश इंग्रजांचा होता. या दृष्टीने काही उपाय योजिले. यामध्ये प्रामुख्याने "रयतवारी पध्दत" लागू केली. या रयतवारी पध्दतीनुसार जमिन शेतक-याच्या मालकीची झाली, त्यामुळे आपोआपच उत्पन्न वाढले. शेतसारा तीस-तीस वर्षासाठी एकदाच लागू केला. यामुळे उत्पन्न वाढवून तो भरण्याची जबाबदारी शेतक-यावर पडली.

सरकारने शेतजमिनीचा सर्व्हे केला, प्रत्येक जमिनीला भूमापन क्रमांक दिला, आधुनिक तंत्रज्ञान, शेतीची अवजारे, मशागतीच्या नवीन पध्दती, शेतक-यांना कर्ज पुरवठा करणा-या पतसंस्था, जमिनीला पैसे पुरविणा-या सावकारांपासून शेतक-यांची पिळवणूक थांबविण्यासाठी काही कायदे केले. कालवे, छोटी मोठी धरणे बांधलीत, विहीरी खोदण्यास प्रोत्साहान दिले. नवीन बी-बीयाणे पैदास करण्याचा प्रयत्न केला, शेतीव्यवसायाचे व्यापारीकरण केले पण हे सर्व फारच थोडया प्रमाणात झाले. त्यामुळे शेतक-यांचा प्रश्न सुटला नाही.

वरील प्रकारे इंग्रज सरकारने अनेक सुधारणा करण्याचा प्रयत्न केला असला व फुलेंचा इंग्रज-न्यायबुध्दीवर विश्वास असला तरी मुळात त्यांना "बळीचे राज्य" अभिप्रेत होते. कारण फुले म्हणतात की, ते खरेखुरे शेतक-यांचे राज्य आहे. म. फुले यांनी आपली चळवळ सुरु केली त्यावेळी १८८५ साली भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसची स्थापना झाली होती आणि कॉंग्रेस पक्ष भारतीयांना जास्त राजकीय अधिकार द्यावेत अशी मागणी करीत होता. पण फुले यांच्या मते सध्याच्या परिस्थितीत जर इंग्रज सरकारने जास्त राजकीय अधिकार दिले तर त्याचा फायदा पुढारलेल्या ब्राह्मण वर्गासच मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकरी व इतर ब्राह्मणेत्तर वर्गावर ब्राह्मणांची गुलामगिरी जास्त मजबूत होईल. म्हणून त्यांनी १८५७ च्या उठावास विरोध केला. कॉंग्रेसच्या राजकारणास विरोध केला. याचा अर्थ ते ब्रिटीश साम्राज्यशाहीचे पुरस्कर्ते होते असा होत नाही. कारण ते लोकशाहीचे ... बळीच्या राज्याचे ... खरे पुरस्कर्ते होते. अकाली जर सुधारणा केल्या तर मूठभर ब्राह्मणांच्या सोयीच्या होतील हा त्यांचा मुद्दा होता.

बळीचे राज्य:

जोतीराव लोकशाहीचे खंदे पुरस्कर्ते होते. त्यांना पाश्चिमात्य लोकशाहीतील समता, बंधुता व स्वातंत्र्य या प्रेरणा नेहमी आकर्षित करत असत.[६४] आपल्या देशाच्या अनार्य परंपरेत देखील अशा लोकशाही परंपरा आहेत असे त्यांना वाटत असे म्हणूनच या देशात इराणी आर्य येण्यापूर्वी जे "बळीचे राज्य" होते ते लोकशाही राज्य होते असा त्यांचा दावा होता. लोकांना विशेषत: शेतक-यांना प्रिय असणारे बळीचे राज्य वामनाने कपटाने त्यापासून हिरावून घेतले व संपूर्ण समाजावर ब्राह्मणांची गुलामगिरी लादली असे त्यांचे मत आहे.[६५]

बळीचे राज्य हे लोकशाही राज्य होते किंबहुना आर्य येण्यापूर्वी प्राचीन काळी सर्व देशभर लोकसत्तात्मक राज्ये होती असा क्रांतीकारक विचार जोतीरावांनी त्यांच्या"शेतक-यांच्या आसूड" मध्ये मांडला. आहे. म. फुले सांगतात की, निसर्गाच्या मदतीने हळूहळू माणूस स्थिर झाला व तेथपासून उपजीवीका शोधत शोधत कुटूंब-गाव-राज्य निर्माण झाले. राज्यामधील लोक हुशार प्रतिनिधींची निवड करुन सर्वानुमते प्रशासन यंत्रणा स्थापन केली आणि त्या लोकसत्ताक राजवटीत लोक काही काळ आनंदाने राहिले. पण हळूहळू ही यंत्रणा लयास गेली व ९६ कुळीचे प्रतिनिधी स्वत:च राजे बनून राहिले. पण त्यांचा इराणातून आलेल्या आर्यांनी पराभव केला. आर्यांचा नृसिंह, परशुराम, वामन वगैरे योद्ध्यांनी येथील मूळ लोकांचा पराभव करुन त्यांना आपले दास शूद्र अतिशूद्र बनवून त्यांच्यावर आपली गुलामगिरी लादली.[६६] प्राचीन काळी भरतामध्ये ५६ देशामध्ये गणराज्ये होती व यासर्वांमध्ये शेतकरी राजा होता. याविषयी फुले लिहितात.

> आमच्या देशीचे अतुल स्वामी वीर।। होते रणधीर। स्मरु त्यास ।।
> बळिस्थानी आले शूर भैरोबा। खंडोबा जोतिबा। महासुभा ।।
> सद्गुणी पूतळा राजा मुल बळी। दसरा दिवाळीं। आठवीती ।।
> क्षेत्रीय भार्या इडापिडा जावो। बळी राज्य येवो। अशा कांबा १ ।।
> आर्यभट आले सुवर्ण लुटीलें। क्षेत्री दास केले। बापमत्ता ।।
> वामन का घाली बळी रसातळी। प्रश्न जोतीमाळी। करी भटा ।।[६७]

आर्यांनी येथील मूळ रहिवाशांचा पराभव केला आणि जातिभेदाचे व वर्णभेदाचे भूत उभे केले. त्यासाठी श्रमविभागणीवर आधारलेली वर्ण-व्यवस्था स्थापन केली. शूद्रांना धर्मविषायक भूलथापा मारुन त्यास स्वत:चे कायिक वाचिक व मानसिक गुलाम केले.

भारतात जरी बळीची परंपरा गाडली गेली असली तरी युरोपात ती शक्तीशाली होती असे जोतीरावांचे मत होते. तिचा उदय प्रथम ग्रीस देशात झाला. ग्रीक लोक लोकशाहीचे व प्रजासत्ताकाचे पुरस्कर्ते होते म्हणूनच स्पार्टाने धर्मापिलीच्या खिंडीत इराणच्या झोझिंस-च्या प्रचंड सैन्याचा पराभव केला.[६८] त्यानंतर दीनांचा कैवारी अशा बळी राजाचे येशू ख्रिस्ताचे आगमन झाले त्यांने सत्यमय ज्ञानाचा प्रसार केला.[६९] पण त्याच ज्ञानाच्या जोरावर पुढे इंग्रजानी आपल्या प्रजासत्ताक राज्यात लोकशाही, वंशपरंपरागत बडे लोक यांची मिसळ करुन एक गोड कडबोळे तयार केले आणि सर्वांची समजूत काढली.[७०] बळीच्या विचारांचा पुढचा टप्पा म्हणजे फ्रेंच व अमेरिकन राज्यक्रांती. अमेरिकन राज्यक्राती शेतक-यांचे पुढारी जॉर्ज वॉशिंग्टन यांनी घडवून आणली म्हणून ते त्यास परम आदराने महाप्रतापी "वॉशिंग्टनतात" असे संबोधितात.[७१]

थोडक्यात जोतीरावांच्या मते हे सर्वच पुढारी बळीचे खरेखुरे अनुयायी होते, ज्यांनी लोकांच्या जीवनात क्रांती घडवून आणली आणि त्यांना स्वातंत्र्य, समता व बंधुभाव यांचे महत्त्व पटवून दिले. पण भारतात मात्र ही परंपरा दडपली गेली.

## म. फुले यांचे राजकीय विचार:

जोतीरावांच्या राजकीय तत्त्वज्ञानाचे मूळ स्वरुप अतिशय क्रांतीकारक होते आणि हे विचार बनवीत असताना त्यांनी आपले गुलामगिरी हे पुस्तक अमेरिकन गुलामांच्या मुक्तीसाठी झगडणा-या लोकांना अर्पण केले आहे. त्यांनी असे मत व्यक्त केले आहे की मानवी स्वातंत्र्य हा मानवाचा नैसर्गिक अधिकार आहे आणि तो प्राप्त केल्या-

शिवाय त्याचे हित होत नाही व त्यास सुख मिळत नाही."[७२] म्हणून अशा स्वातंत्र्याला प्रस्थापित करणारी लोकतंत्रात्मक राजवट हीच खरी राजवट आहे. जोतीरावांचे असे मत होते की मुळातील बळीचे राज्य हे लोकसत्तात्मक राज्य होते पण नंतर छप्पन्न देशातील लोकांनी त्याची कास सोडली म्हणून त्यांना आर्यांचे गुलाम व्हावे लागले.[७३] बळीचे राज्य हे शेतक-यांचे व कष्टक-यांचे राज्य आहे आणि या देशातील देशाभिमानाची बरोबरी कोणीच करु शकत नाही. त्यांनी आपल्या मताच्या पुष्टीसाठी ब्रूटस, जॉर्ज वॉशिंग्टन व लफेटे यांची उदाहरणे दिली आहेत.[७४] बलीस्थानातील मूळ लोकतांत्रिक परंपरेशी आपला धागा जोडीत असतानाच जोतीरावांनी संपूर्ण वैदिक परंपरेला व तिच्या राजकीय तत्त्वज्ञानाला आव्हान दिले आहे. वर्ण जातीवर आधारलेली, राजाला देव मानणारी, शूद्रांशी कपट करणारी आर्यांची परंपरा त्यांना अमान्य होती.

शूद्रांनी विद्या संपादन करुन वर्ण-जातीभेदावर उभी असलेली ब्राह्मणशाही सरंजामदारी रचना पूर्णपणे मोडून टाकावी असे त्यांचे मत होते. त्यांची आदर्श राज्याची कल्पना त्यांच्या सार्वजनिक सत्याच्या कल्पनेवर आधारलेली जात त्यांनी सर्व जातींना न्याय देणारी, सर्वधर्म समावेशक, विश्वकुटुंबात्मक कष्टक-यांची लोकसत्तात्मक आदर्श रचना घडविण्याचा प्रस्ताव मांडला.[७५] त्यांनी धर्माची बनावटगिरी नको, वस्तूंचा श्रमाप्रमाणे उपभोग घ्यावा. सर्वांनी एका कुटुंबातील भाऊ-बहिणीसारखे राहावे असे राज्य म्हणजे निर्मिकाचे अंमल असणारे राज्य. निर्मिकाचे राज्य ही एक अमूर्त कल्पना आहे आणि व्यवहारात त्याचा अर्थ आदर्श राज्य असाच घ्यावा लागेल. या आदर्श समाजाचे चित्र

म. फुल्यांनी सत्यवर्तनाच्या ३३ कलमी नियमावलीत केले आहे.

म. फुले यांची आदर्श राज्याची कल्पना अतिशय क्रांतीकारी आणि विश्वकुटुंबात्मक आहे. त्यांना अभिप्रेत असलेले बळीचे राज्य हे श्रमिकांचे व शेतक-यांचे राज्य होते व ते लोक सत्तात्मक होते. पण म. फुले यांच्या विचारांची झेप याही पुढे जाते. ते लिहितात, "एकंदर सर्व जगातील लोकांनी आपआपल्या मुलामुलीस शाळेत घालवून त्यास सत्यज्ञानविद्या दिल्याबरोबर सहजच ते सद्‌गुणी झाल्यामुळे कोणी कोणाच्या राष्ट्रावर स्वा-या करणार नाहीत आणि यामुळे एकंदर सर्व जगात जागेजाग शेतक-यासह कारागिरांच्या निढळाच्या घामाचे कोटयावधि रुपये खर्ची घालून निरर्थक फौजफाटे ठेवण्याचा त्या संस्थानास प्रसंग येणार नाही."[७६] अशा प्रकारे लोक सत्याचरणी झाल्यानंतर जशी सैन्याची गरज भासणार नाही तशी राज्याच्या दमनयंत्राचीपण गरज भासणार नाही. हे आदर्श "राज्य" या जुलमी संस्थेपासून मुक्त असेल, ते म्हणतात, "की सर्वजग जर एका कुटुंबातील लोकाप्रमाणे आनंदाने राहतील तर "एकंदर सर्व जगातील देवबापा परशुरामादि शिपायास, पोलिसास, न्यायाधिशास व तुरुंगावरील शिपायास अजिबाद फाटा द्यावा लागेल."[७७]

या आदर्श राज्याच्या तत्त्वांना मूर्त स्वरूप देण्यासाठी श्रमिकांची लोकसत्तात्मक राजवट आणण्यासाठी व जुन्या जुलमी रचनेला मूठमाती देण्यासाठी व्यावहारिक पातळीवर ताबडतोब सुधारणा करणारा त्रिसूत्री कार्यक्रम त्यांनी लोकांसमोर मांडला. १) सार्वत्रिक शिक्षण प्रसार, २) सार्वत्रिक नोकर भरती, व ३) सार्वत्रिक शेतीविकास याशिवाय समाजाची किंवा संघटनाची स्थापना करून ग्रंथप्रसार करणे, वर्तमानपत्रे काढणे वगैरे कार्यक्रम त्यांनी लोकांपुढे मांडले.

शेतक-यांनी आपली लोकसत्तात्मक राज्वट निर्माण करण्या-साठी आघाडी निर्माण केली पाहिजे असे जोतीराव सांगतात. त्यांनी आपल्या आघाडीत तीन शक्तींचा समावेश केला. शूद्र, अतिशूद्र यांच्यातील भेद कृत्रिम आहेत कारण मुळात ते एकाच बळीस्थानाचे रहिवाशी आहेत. त्यामुळे एकी होउ शकते. ब्रिटीशांच्या राज्यामुळे आपणास ब्राहमणांच्या गुलामगिरीची जाणीव झाली. नव्या विकासाची वाट मोकळी झाली व त्यांच्या स्वतंत्र्य राज्यपध्दतीमुळेच आपण हे विचार मांडू शकलो असे म. फुले म्हणतात.[७८] म्हणून ब्रिटीशांचे राज्य ही निर्मीकाची एक योजना आहे असे त्यांना वाटत होते. आपला कार्यक्रम राबविण्यासाठी त्यांचा पाठिंबा घेतला पाहिजे, हे सांगताना ते म्हणतात,

"अत्यंजांनो तुम्ही उपकारते स्मरा। पोटी गच्चधरा। इंग्लिशास।।
आर्य हितासाठी न्याशनल सभा। शुद्रादिका शोभा। कैसी राहे।।
गो-या लोका घ्यावे सभेमध्ये। जावो हाणून पाडावे। ब्रहमकूट।।[७९]
ते ब्रिटीश राणीला आपल्या मोच्र्याची धनीत म्हणतात..."

"धन्य राणीबाई। झोप कैसी घेई।
आहेस मोच्र्याची धणीन खासा।
सोडवी दीनबंधूस।
शोध स्वत:चा। जोतीरावाचा।
कळवितो राणीबाईस। सोडवी गुलाम केल्यास। [८०]

जोतीरावांची लोकशाहीची संकल्पना:

जोतीराव लोकशाहीस "बळीचे राज्य" कष्टकरी जनतेचे राज्य असे संबोधित असत. त्यांनी लोकशाहीची संकल्पना युरोपातील उदारमतवादी

विचारांच्या चौकटीत व्यक्त केली आहे. ते पुन: पुन: सांगतात, की इंग्रजांच्या स्वतंत्र राजवटीमुळेच त्यांना ब्राह्मणांच्या जुलमाविरुध्द विचार व्यक्त करता आले."[८१] म. फुल्यांच्या लोकशाही कल्पनेमध्ये मानवी हक्क या कल्पनेला महत्त्वाचे स्थान आहे. कारण सर्व मानवास निसर्गत:च समान हक्क प्राप्त झालेले आहेत. स्त्री-पुरुषांना त्यांचे हक्क कळवून त्याप्रमाणे वागणे म्हणजे सत्याने वागणे असे त्यांचे मत होते.[८२] म्हणूनच त्यांच्या ३३ सत्यवर्तनाच्या नियमांत 'निसर्गत:च स्त्रीपुरुष एकंदर सर्व अधिकारांचा उपभोग घेणेस पात्र आहेत' अशा अर्थाचा पहिला नियम केला आहे.[८३] हे सत्यवर्तनाचे ३३ नियम म्हणजे जोतीरावांच्या स्वातंत्र्यवादी विचारांचा जाहीरनामाच आहे. त्यात त्यांनी धार्मिक, राजकीय व सामाजिक स्वातंत्र्य मान्य केले आहे. सर्व मानव स्त्री पुरुषास निर्मिकाने मानवी हक्काचे, धर्म विषयक व राजकारण विषयक हक्काचे धनी केले आहे. असे ते बजावतात."[८४]

जोतीराव स्वातंत्र्याचे भोक्ते होते. त्यांच्या लोकशाहीच्या कल्पनेचे दुसरे महत्त्वाचे अंग म्हणजे त्यांची आदर्श राज्याची कल्पना त्यांना अभिप्रेत असलेल्या मूर्त मूल्यांच्या आधारे "निर्मिकाच्या राज्याची रूपरेषा रेखाटली आहे. त्याचे निर्मिकांचे राज्य बंधुत्त्वाच्या कल्पनेवर आधारलेले आहे म्हणूनच ते विश्व कुटुंबात्मक आहे. ते सांगतात की, या राज्यात धर्माची बनवाबनवी नसेल, लोक वस्तूंचा श्रमाप्रमाणे मोबदला घेतील व ते परस्परात बंधुभवाने राहतील"[८५]

थोडक्यात सांगायचे झाले तर जोतीरावांची लोकशाहीची कल्पना उदारमतवादी लोकशाही विचारांच्या चौकटीतच विकसित झालेली आहे आणि त्याचे "निर्मिकाच्या राज्या"विषयीचे विचारपण त्याचाच परिणाम आहे.

काँग्रेसच्या राजकारणाला विरोध:

जोतीरावांना भारतात शेतक-यांचे राज्य स्थापन व्हावे असे वाटत होते, पण तसे राज्य "इंडियन नॅशनल काँग्रेस" आणू शकणार नाही कारण जास्तीत जास्त जोखमीच्या जागा मागून ब्राह्मणांची गुलामगिरी लादण्याचा तो एक ब्राह्मणी कावा आहे असे त्यांचे मत होते. त्यामुळे ते नॅशनल सभेस "नारदाचा सुभा" म्हणतात.[८६] ती आर्य हितासाठी स्थापन झालेली आहे. त्यात शुद्रस शोभा नाही.[८७]

म. फुल्यांनी तत्कालीन ब्राह्मण पुढा-यांच्या वागण्यातील व बोलण्यातील फरक माहीत होता म्हणून त्यांनी त्यांची एकीची कल्पना धुडकावून लावली. कारण काँग्रेस शूद्रातिशूद्र व इंग्रज यांच्यामध्ये उगीचच वैर पसरवत आहे. शूद्रातिशूद्रांची ब्राह्मणांच्या गुलामगिरीतून इंग्रजांनीच सुटका केली. ब्राह्मण व शूद्रांच्या मध्ये एकी होणार नाही असे जोतीराव सांगतात.

"सावली न घेता महारानांगाची ।।
प्रीत बंधूत्वाची । जोड कैसी ।।
न्याशालन सभा इंग्रज का बोधी ।।
सत्यवर्ता आधी । जोती म्हणे ।।[८८]

ज्यांना सत्यप्रीती व बंधुप्रीती नाही त्यांच्या एकीच्या कल्पनेची टवाळी करून ते कडाडतात.

"जाळ तुझी फुकी एकी ।
धूर्त नारी । अर्धमुकी ।।
तुम्ही आर्य कार्यसाधु ।
नव्हत शूद्राचे हो बंधु ।। [८९]

ब्राह्मणांच्या एकीच्या कल्पनेस त्यांनी कडाडून विरोध केला आणि जोपर्यंत ब्राह्मण मानवी हक्क व मानवा मानवांतील समानता व्यवहारात मानीत नाहीत, तोपर्यंत त्यांच्या लोकशाही व राष्ट्रवादाच्या गप्पा फुकया आहेत. जोतीरावांचे कॉंग्रेसला विरोध असण्याचे खरे कारण त्यातील ब्राह्मणांचे प्रभुत्व हे होते. कॉंग्रेस ही नावाला "नॅशनल" आहे आणि सार्वजनिक सभा ही नावाला "सार्वजनिक" आहे प्रत्यक्षात त्यांचे सर्व सभासद ब्राह्मण आहेत आणि त्यांचा देशातील अठरापगड जातींशी काहीही संबंध नाही, म्हणून त्या मोठया व फसव्या नावात काहीच अर्थ नाही असे जोतीराव सांगतात.[९] त्यामुळे या पुढा-यांनी शेपन्नास अर्धकच्चे शूद्र लोक घेऊन तात्पुरती एकी करण्याचा प्रयत्न केला तरी तो क्षणिकच ठरणार आहे.[९१] कारण मूलत: राष्ट्रही कल्पना ब्राह्मण पुढारी सांगतात त्यापेक्षा वेगळी आहे.

या राष्ट्रात सर्व जातीस व माणसास समान अधिकार प्राप्त होणार आहेत पण ब्राह्मणग्रस्त कॉंग्रेसपक्ष मात्र तसे करु देणार नाही. यासाठी त्यांनी ब्राह्मणेत्तर शेतक-यांची वेगळी आघाडी उभा करण्याचा विचार मांडला. यात ब्रिटीश सरकारशी सहयोग त्यांना अभिप्रेत होता.

## ९) म. फुले व शेतकरी प्रश्न काही टिकात्मक विचार:

१९व्या शतकात सुधारणाविषयक विविध चळवळी झाल्या. प्रबोधनात्मक लेखन झाले परंतु त्यातील बहुसंख्य सुधारणा आणि प्रबोधनात्मक लेखन हे प्रामूख्याने उच्चवर्णियांच्या भोवती घोटाळत होते येथे ही महात्मा फुले यांचा एकमेव अपवाद होता. शूद्र अतिशूद्र आणि स्त्री हे त्यांच्या चिंतन लेखनाचे आणि कार्याचे प्रमूख केंद्र होते.[९२] १९वे शतक हे महाराष्ट्राच्या जीवनाच्या एका नव्या घडणीचे शतक होते.

शेती व्यवस्थेपासून ते न्याय व्यवस्थेपर्यंत इंग्रजांनी एक नवी रचनाच येथे निर्माण करण्याचा प्रयत्न केला होता. नव्या सरकारच्या शिक्षण-विषयक धोरणांचा एक परिणाम मात्र असा झाला की उपेक्षितांना व्यक्तिमत्त्व असते शूद्र, अतिशूद्र ही माणसेच असतात आणि कष्टक-यांच्या दैन्यावस्थेला एक विशिष्ट समाज जबाबदार आहे याची जाणीव उपेक्षितांना झाली आणि या उपेक्षितांचा आवाज प्रथमत: प्रकट झाला तो महात्मा फुल्यांच्या रूपाने.

महात्मा फुल्यांच्या एकूणच लेखनाला तीन स्तर होते. उपेक्षित कांच्या दारिद्र्याचा, दु:खाचा वेध घेत असताना ते आपल्या समकालीन समस्यांची पाळेमुळे इतिहासात कशी दडली आहेत हे सिध्द करतात. तर दुसरीकडे वास्तवतेची दाहकता किती घट्ट आहे ते सांगतात. या समस्यावरती ते उपाययोजना सुचविण्याचा प्रयत्न केला होता. "शेतक-यांचा आसूड" हा म. फुले यांचा अतिशय महत्त्वाचा ग्रंथ होय. आपले आजू-बाजूस अफाट पसरलेल्या जनसमुदायाकडे सहानुभूतीने पाहण्याची दृष्टी म.फुलेनी सर्व प्रथमत:च दिली.

"शेतक-यांचा आसूड" या ग्रंथामध्ये म. फुलेने शेतक-याच्या दयनीय अवस्थेचे वर्णन केले आहे. म. फुलेने शेतक-यांच्या सर्वनाशास ब्राह्मणानांच जबाबदार धरले आहे. "शेतक-यांच्या जन्मापासून ते मृत्यूपर्यंत ग्रामव्यवस्थेतील उच्चवर्णीय ब्राह्मण आपल्या उच्चवर्णीयात्वाचा फायदा घेऊन आर्थिक शोषण कसे करतात याचे हुबेहुब चित्रण म. फुले यांनी प्रभावीपणे केले आहे."[९३]

ब्रिटीशांचे येथील आगमन त्यांनी काही सुधारणा करण्याचा

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

केलेला प्रयत्न, त्यांची सहिष्णु राजवट यांनी भारावलेल्या म.फुले यांना इंग्रजाच्या मार्मिक डावपेचांचे मर्म आकलन व्हायला बराच कालावधी जावा लागला. फुले यांच्या उत्तर आयुष्यातील लिखाणातून डोकावणारी इंग्रजावरील टीका, रोष यातून त्यांना इंग्रज भेद नीतीचा परिचय होऊ लागल्याचे सूचित होते. तोपर्यंत इंग्रजांच्या राज्यात सर्वासाठी जातपात, धर्म-पंथ भेदातीत राजवट, न्यायपध्दती हेच एकमेव आकर्षण होते. पिढयान् पिढया दुर्लक्षिलेल्या शूद्रातिशूद्रांना इंग्रजी राजवटीत विद्येच्या प्रांतात चंचुप्रवेश करण्यास संधी सापडली हाच इंग्रजी राजवटीत सर्वात मोठा, महत्त्वाचा फायदा झाला होता. परंतु वारंवार पडणाऱ्या दुष्काळांनी, सर्व सरकारी खात्यातील ब्राह्मण प्राबल्याने होणारी इतर बहुजन समाजाची नाडणूक आणि दिवसें दिवस दुर्बल, दारिद्री होत जाणारा शेतकरी वर्ग पाहून त्यांचे लक्ष आर्थिक व्यवस्थेकडे लागले आणि त्या खात्यातील बजबजपुरी, पक्षपात यांनी त्यांना त्या विरुध्द झगडण्यास प्रवृत्त केले. म. फुले यांनी आक्रमक भूमिका घेतली असली, इंग्रज सरकारवर दोषारोप केले असले, तरी त्यांना मूळ आणि एकमेव खरा गुन्हेगार ब्राह्मण वर्गच वाटत होता. हे सत्य नाकारता येत नाही. जनतेला ज्ञानसंपन्न सुसंस्कृत व्हावयास जी आर्थिक सुबत्ता व्हावयास पाहिजे ती उत्पन्न करण्याची ताकद ब्रिटीश राज्याची अंगी नव्हती. "ब्रिटीश राज्यापूर्वीचा येथील बहुजन समाज ब्रिटीश राज्यापूर्वीची हिंदी जनता जितकी अज्ञानी व मागासलेली होती, तितकीच या राज्यातही राहिली."[९४] हे सत्य फुले यांना स्पष्ट स्वरूपात उमगले नाही.

प्रा. गं.बा. सरदार म्हणतात, "जोतीरावांचा दृष्टीकोन मात्र अत्यंत एकांगी व अशास्त्रीय होता. कोटयावधी शूद्रातिशूद्राची स्थिती सुधारावी अशी त्यांना मनापासून तळमळ होती. त्या अत्युच्च ध्येयाच्या सिध्दीसाठी लागेल तो स्वार्थत्याग करण्याचीही त्यांची तयारी होती. परंतु आपल्या दलित बांधवांच्या वाढत्या दारिद्रयाचे त्यांना अचूक निदान करता आले नाही. ब्राह्मणांच्या द्वेषाने जोतीराव अंध बनले होते. त्यामुळे इंग्रजांचे राजकीय डावपेच त्यांना उमगले नाहीत.[९५] इंग्रज राजवटीखाली शेतकरी नागवला गेला. सतत वाढणारा सारा लोकल फंड, वेगवेगळया जकाती, मीठाचा कर, पाण्याचा दर, ब्राह्मणी आणि व्यापारी वसब मुळे लूट या सर्वांची नोंद फुल्यांनी सतत घेतली आहे. पण त्यांची या सर्व शोषणाची व जुलूम जबरदस्तीची जबाबदारी त्यांनी प्रथमत: आणि मुख्यत: ब्राह्मणावर आणि काही प्रमाणात मारवाडी, गुजर, व्यापारी दलालांवर टाकलेली दिसते. ब्राह्मणांवर त्यांनी आणखीही जबाबदारी टाकलेली आहे. ती स्थानीक, सरकारी अधिकारी व नोकर म्हणून त्याचप्रमाणे धार्मिक गुरु म्हणून करशाही ही केवळ धार्मिक सामाजिक वर्चस्वाची मक्तेदारी नव्हती, ती आर्थिक शोषणाचीही मुक्ती होती, भटा-भिक्षुकांच्या ऐतखाऊ पणाचा तो पाया होता हे सर्व फुल्यांनी जे काही म्हटलेले आहे ते अक्षरश: खरेच होते. पण म. फुल्यांच्या निरीक्षणातील आणि विचारांतील अपुरेपणा जाणवतो तो त्यांच्या इंग्रजासंबंधीचा, प्रा. नलिनी पंडित ही म्हणतात की, "भांडवलदारांच्या वाढत्या सामर्थ्याकडे दुर्लक्ष करुन आर्थिक व सामाजिक क्षेत्रातील सर्व अप्रिय घडामोडीबद्दल त्यांनी ब्राह्मणांनाच जबाबदार धरले."[९६] तेव्हा शोषणास ब्राह्मण वर्ग जबाबदार होता हे जरी सत्य असले तरी इंग्रज राज्यकर्ते निर्दोष नव्हते, किंबहूना सारा, लोकलफंड,

वेगवेगळे कर, जकाती यामध्ये सतत होत जाणारी वाढ ही सरकारी धोरणानुसारच होत होती आणि ते धोरण ठरविणारे खुद्द इंग्रजच होते. त्याचप्रमाणे सावकारी चालू देणारे, कर्जबाजारी पणापायी शेतक-यांच्या जमिनीचे सावकारांकडे हस्तांतर होऊ देणारे कायदे स्वत: इंग्रजातीच केले होते. शेतीमालाचे वाजवी भाव शेतक-यांच्या पदरात न पडता, त्याची व्यापारी लूट दलालामार्फत होऊ देण्याचे मूळ धोरण खुद्द इंग्रजाचेच होते, तो तर त्यांच्या वसाहती शोषणाचा, विषम, बाजार पेठेमार्फत करण्यात येणा-या लुटीचा मुख्य पायाच होता. खेड्यातील व्यापारी दलाल हे त्या जगड्व्याल वसाहतिक शोषणपध्दतीचा आणि ती जबरदस्तीने लादणा-या इंग्रज राजवटीचा भारत देशाचे सर्वंकष शोषण हा अंगभूत गुणधर्मच होता. वसाहती शोषणाचे हे गूढ शंभर सव्वाशे वर्षापूर्वी म. फुल्यांना उलगडले नव्हते, ही गोष्ट स्पष्टच दिसून येते. (समजून घेणे जरूर आहे.)

प्रा. औटी-चौसाळकर यांच्या मते जोतीरावांनी केवळ ब्राह्मणशाही पिळवणूक ही साम्राज्यशाही पिळवणुकीचाच एक भाग आहे हे त्यांच्या लक्षात आले नाही. परिणामी ब्राह्मणशाही पिळवणूकीला आधारभूत असलेल्या सरंजामी रचनेवर व त्यातही त्यांच्या सांस्कृतिक अंगावर त्यांच्या हल्ल्याचा रोख राहिला. त्यातून जरी लोकशाहीचे क्रम विकसित होऊ शकत असले तरी साम्राज्यशाहीचे हितसंबंध सरंजामदारी मागासपणाला टिकवून धरण्यात आल्यामुळे व जनतेचे लोकशाहीकरण त्यांच्या हित-संबंधांच्या विरोधात जात असल्यामुळे ब्रिटीश त्यास अटकाव करीत होते. शिवाय वसाहतिक रचनेत तयार झालेल्या भिन्न जातीतील जातीय श्रेष्ठ-कनिष्ठत्वाची भावना असलेल्या मध्यमवर्गीय विभागांना जातीय स्पर्धेत

ओढून त्यास जातीय झगडयातच रूपांतर करणे हे त्यांचे धोरण बनत चालले होते. त्यामुळे वाढू पहाणा-या लोकशाही क्रांतिक्रमांना अटकाव करता येत होता. पण फुल्यांच्या विचाराला हा समज येऊ न शकल्याने ब्रिटीशांशी त्यांच्या दोस्तीचा मार्ग मोकळा राहिला. [१७]

वास्तविक पहाता ब्रिटीशांनी आपला देश आणि देशांतील लोकांना विशेषत: शेतकरी वर्गाला लुबाडले हे सत्य आहे. भारताला विशेषत: शूद्र, अतिशूद्रांना अन्नवस्त्राचीही चिंता पडायला सर्वार्थाने इंग्रज अर्थव्यवस्था जबाबदार होती, हे सत्य कोणीही विचारवंत नाकारु शकत नाही. इंग्रजांच्या राजवटीत परंपरागत गावगाडयावर आधारलेली ग्रामीण स्वायत्त व्यवस्था हादरलीच नव्हे तर पार कोसळून पडली. त्यात ब्राह्मण कारभारी, सावकार, मारवाडी, गुजर, व्यापारी, दलाल यांची चलती झाली, याला कारण इंग्रजांची भीषण साम्राज्यशाही राजवट, त्यांची विषम व्यापारीची, दुहेरी लुटीची साहेब शोषणाची राजनीती, बिनतक्रार, अनिर्बंध शोषणास आडकाठी येऊ नये म्हणून लादलेली जुलमी गुलामी राजवट, यामुळेच गावगाडयाला खीळ पडून अर्थव्यवस्था कोलमडली. पण या व्यवस्थेची तशीच उभारणी फुले यांना मान्य नव्हती.

म. फुले यांच्या विचारांवर या सर्व मर्यादा होत्या हे जरी मान्य केले तरी त्यामुळे म. फुले यांच्या विचारांचे महत्त्व कमी होत नाही. कारण त्यांनी प्रथमत: हे दाखवून दिले की केवळ इंग्रजांना दोष दिल्यामुळे सर्व प्रश्न सुटणार नाहीत. इंग्रजांच्या आश्रयाखाली वाढलेला या देशातील जो उच्च वर्णीय समाज आहे तो ही गुलामगिरीच्या सांस्कृतिक सामाजिक व राजकीय

स्वरूपात जबाबदार आहे आणि त्या कार्याविरुध्दही शेतक-यांनी आपला संघर्ष केला पाहिजे. कारण इंग्रज जाऊन पेशवाईची पुनरावृत्ती होणे त्यांना नको होते. या देशात जर खरे बळीचे शेतक-यांचे राज्य स्थापन करावयाचे असेल तर इथला शेतकरी सर्व अर्थाने जागा झाला पाहिजे, त्याच्यात त्याच्या आत्मस्थितीबद्दल, अधिकाराबद्दल जागृती निर्माण झाली पाहिजे व त्याच्या मुलाने नोकरशाहीत व इतरत्र मोक्याच्या जागा जागा मिळविल्या पाहिजेत, असे त्यांचे मत होते. म्हणूनच सर्वांगिन शेती सुधारणे बरोबरच त्यांनी शेतक-याच्या सांस्कृतीक राजकीय व सामाजिक समस्यांचा विचार केला व प्रतिपादन केले की शिक्षण व जागृती हा शेती प्रश्नाचा सुधारणेचा मूळ पाया आहे.

## - संदर्भ -


१) पंडित नलिनी — महाराष्ट्रातील राष्ट्रवादाचा विकास, नलिनी पंडित, बांबुळी निवास, माहीम मुं.१६, प्र.आ.१९५५ पृ. ३४

२) Shinde J.R. — Dynamics of cultural revolution 19th century Maharashtra. Ajanta Publication, Jawahar Nagar, Delhi-7, 1985 P-120

३) Ibid — P- 122.

४) साळुंखे पी.बी. — महात्मा फुले गौरवग्रंथ, महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई, १९८२, पृ.७१,७३.

५) कीर धनंजय व स.ग.मालशे(सं) — महात्मा फुले समग्र वाङ्‌मय, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ मुंबई,१९८०, पृ.३५६

६) उक्त पृ. ३५८

७) उक्त पृ. ३६८

८) उक्त पृ. ८९-९०

९) उक्त पृ. ४७४

१०) उक्त पृ. ४७५

११) उक्त पृ. २२३

१२) उक्त पृ. ८४

१३) उक्त पृ. ७४

१४) चिपळूणकर विष्णू शास्त्री- निबंधमाला १९३९ सं.बनहट्टी श्री.ना. सुविचार प्रकाशन मंडळ, नागपूर पृ.४६६-६७

१५) टिकेकर श्री.रा.(संपा.)लोकहितवादींची शतपत्रे पृ.७१.

१६) आगरकर गोपाळराव निबंध संग्राह प्रकाशक बा.म.फडतरे.

१७) साळुंखे पी.बी. महात्मा फुले गौरव ग्रंथ पृ. ५२८

१८) उक्त पृष्ठ ५२८

१९) सरदार गं.बा. महात्मा फुले व्यक्तित्व आणि विचार, दिनकर गंगाल, अभिनववाचक चळक मुंबई जून,१९८१, पृ.८६

२०) म.फुले समग्र वाङ्.मय पृ. १८९.

२१) उक्त पृष्ठ २१३

२२) उक्त पृष्ठ २३४

२३) उक्त पृष्ठ २५०

२४) कीर धनंजय महात्मा जोतीराव फुले आमच्या समाज क्रांतीचे जनक २०८ रामदास फटक्ळ मुंबई ३४, पृ.२१२-१३.

२५) म.फुले समग्र वाङ्.मय पृ. १९२

२६) उक्त पृ. १९४

२७) उक्त पृ. १९५

२८) म. फुले समग्र वाङ्.मय पृ. १९५-९६

२९) उक्त पृ. १९६

३०) उक्त पृ. १९९

३१) उक्त पृ. ५२

३२) उक्त पृ. ५३

३३) उक्त पृ. ४७८

३४) उक्त पृ. ५०१

३५) उक्त पृ. ५४

३६) उक्त पृ. १४८

३७) उक्त पृ. १४८

३८) उक्त पृ. ३८

३९) उक्त पृ. १२९

४०) उक्त पृ. १३२

४१) उक्त पृ. १४८

४२) उक्त पृ. १३१

४३) उक्त पृ. १३२

४४) उक्त पृ. १३१

४५) उक्त पृ. ५७

४६) उक्त पृ. ६२

४७) उक्त पृ. ६३

४८) साळुंखे पी.बी. महात्मा फुले गौरव ग्रंथ पृ. १०४

४९) म. फुले समग्र वाङ्मय पृ. २४७

५०) उक्त पृ. २६३

५१) उक्त पृ. २४८

५२) उक्त पृ. २४७

५३) उक्त पृ. २६३

५४) उक्त पृ. ४७९

५५) उक्त पृ. ३८

५६) उक्त पृ. ४६४

५७) म. फुले समग्र वाङ्.मय पृ. २०४

५८) देशमुख गो.ह. लोकहितवादी शतपत्रे १९६० संपा.डॉ.इनामदार ना.र.कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे पृ.३८

५९) नलिनी पंडित महाराष्ट्रातील राष्ट्रवादाचा विकास पृ.४४

६०) म.फुले समग्र वाङ्.मय पृ. ४७३

६१) म. फुले समग्र वाङ्.मय पृष्ठ ४८५

६२) सरदार ग.बा. महात्मा फुले व्यक्तित्व आणि विचार पृ.१९८

६३) म.फुले समग्र वाङ्.मय पृ.२६२-६३

६४) चौसाळकर अशोक म.फुले यांचे लोकशाहीविषयक विचार, नवभारत सप्टेंबर, १९८२, पृ.२८

६५) म.फुले समग्र वाङ्.मय पृ. १०४-११०

६६) उक्त पृ. १०४-११७

६७) उक्त पृ. ४८९

६८) उक्त पृ. २२६

६९) उक्त पृ. २२६-२७

७०) उक्त पृ. १२१-१२२

७१) उक्त पृ. १३५ व २०३

७२) उक्त पृ. ८५

७३) उक्त पृ. २२५

७४) उक्त पृ. १३५

७५) .औटी व्ही.बी. चौसाळकर ए.एस. म.जोतीराव फुले यांच्या विचारांचे राज्कीय स्वरूप तिसरी महाराष्ट्र राज्यशास्त्र परिषद ३१ जानेवारी, १९८२, शोधनिबंध पृ.८

७६) म. फुले समग्र वाङ्.मय पृ. ४२८

७७) म. फुले समग्र वाङ्.मय पृ. ४१६-४१७

७८) उक्त पृ. २६४

७९) उक्त पृ. ४६६

८०) उक्त पृ. ४८-४९

८१) उक्त पृ. २६४

८२) उक्त पृ. ४७१

८३) उक्त पृ. ४११

८४) उक्त पृ. ४११-४१४

८५) उक्त पृ. ३५६

८६) उक्त पृ. ४९१

८७) उक्त पृ. ४६६

८८) उक्त पृ. ४९६-४९७

८९) उक्त पृ. ४७९

९०) उक्त पृ. ४०६

९१) उक्त पृ. २५९

९२) साळुंखे पी.बी. महात्मा फुले गौरव ग्रंथ पृ. ५२४

९३) उक्त पृ. ५३२

९४) तर्कतीर्थ जोशी लक्ष्मण शास्त्री ज्योति निबंध १९४७ पृ.१७

९५) प्रा. सरदार गंगाबा. महाराष्ट्राचे उपेक्षित मानकरी १९५१, पृ. १३२

९६) प्रा.पंडित नलिनी जात आणि वर्ग १९६५, साधना प्रकाशन पुणे पृ.७२

९७) औटी व्ही.बी.चौसाळकर अशोक . उक्त